रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ९०
www.ramprahar.com
बुधवार, १६ ऑक्टोबर २०२४ ◆पाने ८ ◆किंमत ₹२

अंतरंग

उद्योजक स्व. रतन टाटा यांचे पत्र व्हायरल/२
गेल कंपनीविरोधातील काम बंद आंदोलन स्थगित/५
आजपासून भारत-न्यूझीलंड संघांमध्ये पहिली कसोटी/८

## पालघरमध्ये पुन्हा भूकंप; नागरिकांमध्ये भितीचे वातावरण



**पालघर** : डहाणू, तलासरी तालुक्यात भूकंपाचा धक्का बसल्याने पुन्हा एकदा ग्रामस्थ हादरले आहेत. काही गावांना मंगळवारी (दि. १५) दुपारी ४ वाजून ४७ मिनिटांनी ३.५ रिश्टर स्केलचा भूकंपाचा धक्का बसला. त्याचा केंद्रबिंदू जमिनीखाली पाच किलोमीटर खोल डहाणू तालुक्यातील कंक्राटीजवळ असल्याचे सांगण्यात आले आहे. मागील २०१८पासून पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी तालुक्यामधील गावांना भूकंपाचे धक्के बसत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून भूकंप थांबले होते, मात्र मंगळवारी दुपारी भूकंपाचा धक्का बसला. रिश्टर स्केल व त्यांची नोंद ३.५ अशी करण्यात आली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच पाऊस पडत असल्याने नागरिकांना भूकंपाची भीती वाटत असूनही घराबाहेरही झोपता येत नाही.

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा शंखनाद!

## २० नोव्हेंबर रोजी मतदान, तर २३ नोव्हेंबरला निकाल

**नवी दिल्ली** : वृत्तसंस्था

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम अखेर जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्रात विधानसभेसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार असून २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया, तर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी मंगळवारी (दि. १५) दिली. दरम्यान, राज्यात आदर्श आचारसंहिताही लागू झाली आहे.

केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, आम्ही काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचा दौरा केला होता. त्या दौऱ्यादरम्यान आम्ही निवडणुकीची तयारी योग्य प्रकारे झाली आहे की नाही याची माहिती आम्ही घेतली. लोकसभा निवडणुकीच्या वेळी काही गोष्टी घडल्या होत्या त्या टाळण्यासाठी आम्ही आता पूर्णपणे प्रयत्न करत आहोत. लोकांची मतदानासाठी रांग लागते त्या वेळी काही अंतरावर खुर्ची किंवा बाक रचण्याचा सल्ला आम्ही दिला आहे. ८५ वर्षे आणि त्यावरच्या मतदारांना घरून मतदान करता येणार आहे.

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना त्यांची पार्श्वभूमी तीनवेळा वृत्तपत्रात द्यावी लागेल. आम्ही जेव्हा महाराष्ट्रात बैठका घेतल्या तेव्हा आम्ही त्या संदर्भातले कठोर निर्देश आम्ही राज्य निवडणूक आयोग आणि इतर अधिकाऱ्यांना दिले आहेत, असेही राजीव कुमार यांनी सांगितले.



### एकाच टप्प्यात कार्यक्रम

**निवडणुकीची अधिसूचना** : २२ ऑक्टोबर
**अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख** : २९ ऑक्टोबर
**उमेदवारी अर्ज छाननी** : ३० ऑक्टोबर
**अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख** : ४ नोव्हेंबर
**मतदान** : २० नोव्हेंबर ▌ **निकाल** : २३ नोव्हेंबर

### मतदान केंद्र

राज्यात एक लाख १८६ मतदार केंद्र असून ग्रामीण भागात ५७ हजार ६०१ आणि शहरी भागात मतदान केंद्र ४२ हजार ५८२ आहेत. एका केंद्रावर मतदान ९६०, दिव्यांग सुविधा २९९, महिला अधिकाऱ्यांमार्फत चालवली जाणारी केंद्र ३८८, तर मॉडेल मतदान केंद्र ५३० असणार आहेत.

### ऑन कॅमेरा मतदान

महाराष्ट्रात ऑन कॅमेरा मतदान होणार आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेचे रेकॉर्डिंग होणार आहे. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. गैरप्रकारांवर व्हिडीओ कॅमेऱ्यातून नजर ठेवण्यात येणार आहे. एखाद्या मतदान केंद्रावर काही संशयास्पद कृती आढळून आल्यास किंवा त्या प्रकारची शंका दिसून आल्यास तत्काळ व्हिडीओ रेकॉर्डिंग तपासले जाणार आहे, जेणेकरून त्यावर उचित निर्णय घेता येईल, असे निवडणूक आयुक्तांनी सांगितले.




### निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष होण्यासाठी दक्षता

मतदान केंद्रावर सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, तर पैसे वाटप, दारू वाटप, मोफत गोष्टींचे वाटप यावर लक्ष ठेवलं जाईल. आंतरराज्यीय हालचालींवर देखरेख ठेवण्यासाठी उत्पादन शुल्क, वाहतूक विभाग, जीएसटी यासह इतर विभागाचं पथक असेल. सोशल मीडिया नरेटिव्हवर लक्ष ठेवले जाणार आहे.

निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव आहे. त्यात सर्व मतदारांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे मतदारांनी या उत्सवात सहभागी व्हावे आणि आपली लोकशाही बळकट करावी, असे आवाहनही निवडणूक आयुक्तांनी केले.

### मतदारांची संख्या

९.६३ कोटी एकूण मतदार
४.९३ कोटी पुरुष मतदार
४.६० कोटी महिला मतदार
६,०३१ तृतीयपंथी मतदार
६.३६ लाख दिव्यांग
१२.५ लाख ज्येष्ठ मतदार
२०.९३ लाख नवमतदार

### मतदारांसाठी सुविधा पोर्टल ॲप

निवडणूक आयोगाच्या वतीने सुविधा पोर्टल नावाने ॲप जारी करण्यात आले आहे. या ॲप्लिकेशवर मतदारांना तक्रार करता येणार आहे. एखाद्या ठिकाणी काही घटना घडली किंवा उशिरापर्यंत मतदान सुरू असेल तर केवळ फोटो काढून या ॲप्लिकेशन्सवर अपलोड केला की, ९० मिनिटांत निवडणूक आयोगाची टीम तिथे पोहचेल, असे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.

### मतदारसंघांचा तपशील

राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. यामध्ये २३४ सर्वसाधारण मतदारसंघ असून २५ मतदारसंघ अनुसूचित जमातींसाठी, तर २९ मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी राखीव आहेत.

### नांदेड, वायनाडची पोटनिवडणूकही जाहीर

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीबरोबरच नांदेड आणि वायनाड या दोन लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाने केली आहे. नांदेड लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे वसंतराव चव्हाण विजयी झाले होते. त्यांचे निधन झाले. त्यामुळे ही जागा रिक्त झाली, तर राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्याने वायनाडची जागा रिक्त झाली होती.
या दोन्ही मतदारसंघासाठी निवडणूक कार्यक्रम विधानसभा निवडणुकीप्रमाणे जाहीर करण्यात आला आहे.

## डिजिटल इंडियामुळे भारत बदलला -पंतप्रधान मोदी

### लवकरच ६जी सेवेवर काम करणार

**नवी दिल्ली** : वृत्तसंस्था



गेल्या दहा वर्षांत भारतात मोबाईल आणि इंटरनेटच्या क्षेत्रात मोठी क्रांती झाली आहे. ५जीने एक परिवर्तन दिले आहे. आम्ही लवकरच ६जीवर काम करणार आहोत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि. १५) केले.

पंतप्रधान मोदी यांनी इंडिया मोबाइल काँग्रेस २०२४चे उद्घाटन केले. यंदा या कार्यक्रमाची थीम 'द फ्युचर इज नाऊ' आहे. या कार्यक्रमाचे आयोजन नवी दिल्लीतील प्रगती मैदानावर करण्यात आले असून तो १८ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे.

या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारतातील दूरसंचार क्रांतीच्या क्षेत्रात अलीकडच्या काळात झालेली प्रगती अत्यंत महत्त्वाची आहे. २१व्या शतकात भारताचा मोबाईल आणि टेलिकॉम प्रवास संपूर्ण जगासाठी विशेष आवडीचा विषय बनला आहे. सध्याच्या काळात भारतात १२० कोटी मोबाईल युजर्स आणि ९५ कोटी इंटरनेट युजर्स आहेत. भारताकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. ही देशाची महत्त्वाची कामगिरी आहे.

याचबरोबर आज भारतात दूरसंचार क्षेत्रात झालेली प्रगती अकल्पनीय आहे. आजचा कार्यक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. सॉण्डर्ड आणि सर्व्हिस यांचा संगम आहे. आयटीयू आणि इंडिया मोबाईल काँग्रेसचे एकत्र येणे ही काळाची गरज आहे आणि एक क्रांतिकारी उपक्रमही आहे. भारताने हजारो वर्षांपासून वसुधैव कटुंबकमचा संदेश दिला आहे. संवाद साधणे हे आजच्या भारताचे ध्येय आहे. भारत जगात प्रगतीचा मार्ग मोकळा करत आहे, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

पंतप्रधान पुढे म्हणाले की, जेव्हा लोकल आणि ग्लोबल एकत्र येते, तेव्हा जगाला नवे लाभ मिळतात. टेलिकॉम आणि कनेक्टिव्हिटीच्या क्षेत्रात भारताचे मॉडेल काहीसे वेगळे आहे. भारतात आम्ही दूरसंचार हे केवळ कनेक्टिव्हिटीचे माध्यम नाही तर समानता आणि संधीचे माध्यम बनवले आहे. आज हे माध्यम गाव आणि शहर, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी करण्यात मदत करत आहे. गेल्या दहा वर्षांत डिजिटल इंडिया मोहिमेला मोठे यश मिळाले आहे.

## निवडक

### आणखी एका काँग्रेस आमदाराचे निलंबन

**नाशिक** : इगतपुरीचे काँग्रेस आमदार हिरामण खोसकर यांचे पक्षातून निलंबन करण्यात आले आहे. पक्षाविरोधी काम केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या निर्देशावरून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या सहीने आमदार खोसकर यांना पत्र देण्यात आले आहे.

### मुंबई मनपा कर्मचाऱ्यांना २९ हजार रुपये बोनस

**मुंबई** : महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता जारी होण्यापूर्वी मुंबई महापालिकेतील कर्मचाऱ्यांना २९ हजार रुपये सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महापालिका आयुक्त, प्रशासक भूषण गगराणी यांच्यातील चर्चेअंती पालिका प्रशासनाने बोनसची घोषणा केली.

## भाजप नेते विक्रांत पाटील यांच्यासह सात आमदारांचा शपथविधी

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून अभिनंदन; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आभार

**मुंबई** : प्रतिनिधी

राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून सात जणांची विधान परिषदेवर निवड करण्यात आली आहे. उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या उपस्थितीत या सात जणांना मंगळवारी (दि. १५) आमदारकीची शपथ देण्यात आली.

विधान परिषदेसाठी भाजपकडून बंजारा समाजाचे धर्मगुरू महंत बाबूसिंग महाराज राठोड, भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील व महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ; शिवसेनेकडून माजी खासदार हेमंत पाटील, प्रवक्त्या माजी आमदार मनीषा कायंदे; तर राष्ट्रवादीकडून माजी आमदार पंकज भुजबळ व अल्पसंख्याक विभाग प्रदेशाध्यक्ष इद्रिस इलियास नायकवाडी यांना संधी देण्यात आली आहे.





दरम्यान, शपथविधी झाल्यानंतर आमदार विक्रांत पाटील यांचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, शहर उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे आदी पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या तसेच या नियुक्तीबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेऊन पनवेलकरांच्या वतीने त्यांचे आभार मानले.

या वेळी भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील तसेच तानाजी खंडागळे, समीर कदम, प्रशांत कदम आदी उपस्थित होते.

## पनवेल महापालिकेद्वारे सर्वसमावेशक सुविधा -आमदार प्रशांत ठाकूर

### विकासकामांचे भूमिपूजन

**पनवेल** : रामप्रहर वृत्त

पनवेल महापालिका महाराष्ट्र राज्य, देश अशा सर्व स्तरावर पुढे जाण्यासाठी आगेकूच करीत आहे. खांदा कॉलनीतील माता रमाबाई आंबेडकर सांस्कृतिक भवन, खारघरमधील सामाजिक सभागृहामुळे सर्वसामान्य नागरिकांना विविध कार्यक्रम थाटामाटात साजरे करता येणार आहेत. याचबरोबर महापालिका हद्दीतील आठ किलोमीटरच्या नाल्यांचे सौंदर्यीकरण तसेच मागील आठवड्यात झालेल्या दोन भूमिपूजन व लोकार्पण कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध कामांचा विकास करून महापालिका सर्वसमावेशक सुविधा देत असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.





पनवेल महापालिकेच्या सुमारे ६० कोटींच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन मंगळवारी (दि. १५) करण्यात आले. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. या कार्यक्रमास भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर सीताताई पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, संतोष शेट्टी, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, हरेश केणी, विकास घरत, समीर ठाकूर, अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, प्रवीण पाटील गुरूनाथ गायकर, माजी नगरसेविका आरती नवघरे, अनुसूचित सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता संजय कटेकर, कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे, उपअभियंता राजेश कर्डिले, अनिल कोकरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

या वेळी खांदा कॉलनी येथे माता रमाबाई आंबेडकर सांस्कृतिक भवन, खारघर से. १० प्लॉट नं २५१वर सामाजिक सभागृह, महापालिका हद्दीतील नाल्यांचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वलप, नितळसमध्ये विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल** : रामप्रहर वृत्त

कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल विधानसभा मतदारसंघात विकासाची विविध कामे होत आहेत. या अंतर्गत मंगळवारी (दि. १५) सकाळी पनवेल मतदारसंघातील वलप आणि नितळस येथील रस्त्यांच्या काँक्रीटीकरण कामाचा शुभारंभ भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ७० लाख रुपयांच्या निधीतून वलप गावातील गणेश नगर मुख्य रस्ता ते विश्वनाथ म्हात्रे यांच्या घरापर्यंतचा रस्ता, गणेश नगर मुख्य रस्ता ते प्रकाश सांगडे यांच्या घरापर्यंतचा रस्ता, वल्लभ आदिवासीवाडी रस्ता आणि साईनगर वलप रस्ता तसेच नितळस येथील १० लाख रुपयांच्या निधीतून गावदेवी मंदिरासमोरील रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.



या भूमिपूजन सोहळ्याला भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी जि.प. सदस्य एकनाथ देशेकर, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, खैरणे ग्रामपंचायतीचे सरपंच शैलेश माळी, राजेंद्र गोंधळी, प्रदीप माळी, दीपक उलवेकर, अशोक उलवेकर, निलेश दाढावकर, सागर सांगळे, सज्जन पवार, ग्रामपंचायत सदस्य जोत्स्ना पाटील, नवनाथ खुटारकर, ग्रामसेविका रेश्मा गावंड, राजेश पाटील, अंकुश पाटील, परेश पाटील, हरिश्चंद्र खाडेकर, केशव टेंबे, विश्वनाथ म्हात्रे, सदानंद वनगे, निलेश कुटाळकर, वैभव उसाटकर, जयदीप टेंबे, संगम भोईर, पांडुरंग वाघे, नितळस ग्रामपंचायत सदस्य दर्शना पावशे, नारायण काठे, सोपान काठे, दशरथ सांगडे, वसंत म्हात्रे, चंद्रकांत भोपी, अविनाश गायकर, तुळशीराम पाटील, धर्मनाथ तांबडे आदी उपस्थित होते.

या वेळी भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांनी सांगितले की, गेली अनेक दशके शेकापची या तालुक्यावर सत्ता होती, मात्र त्यांनी गावांच्या विकासासाठी कधी विचार केला नाही. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून २००९पासून कोट्यवधी रुपयांची कामे संपूर्ण मतदारसंघात होत आहेत. त्यांच्या रूपाने आपल्या तालुक्याला विकासपुरुष आमदार लाभला आहे याचा सार्थ अभिमान माझ्यासारख्या कार्यकर्त्याला नेहमीच राहील.

# विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

## रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणुका शांततेत, पारदर्शकपणे आणि भयमुक्त वातावरणात पार पडाव्यासाठी यासाठी तयारी पूर्ण झाली आहे. मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

निवडणूक आचारसंहितेचा भंग केल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. ते विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अलिबाग येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.



यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) नितीन वाघमारे उपस्थित होते. जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन केले जाईल. भारत निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला असल्यामुळे आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. त्यामुळे निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वेच्छाधीन निधीतून अनुदानाचे वाटप, मंत्र्यांचे दौरे व शासकीय वाहनांचा वापर, एकत्रित निधीतून शासकीय जाहिराती प्रसिद्ध करणे, नवीन कामांची किंवा नवीन योजनांची घोषणा करणे, शासकीय सार्वजनिक आणि खासगी संपत्तीचे विद्रुपीकरण इत्यादी बाबींवर निर्बंध लागू राहतील, असेही जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी स्पष्ट केले.

रायगड जिल्ह्यात २४ लाख ६८ हजार १२० मतदार आहेत. यात १२ लाख ५० हजार २५६ पुरुष मतदार, १२ लाख १७ हजार ७७५ महिला मतदार तर ८९ इतर मतदारांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघासाठी ५१ हजार ६१२ नवमतदारांनी नोंदणी केली आहे. दिव्यांग मतदारांची संख्या १३ हजार ४८ आहे, तर ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या ३५ हजार ८५९ एवढी आहे. अनिवासी भारतीय मतदारांची संख्या २३३ आहे, तर एक हजार १६९ सर्व्हिस वोटर आहेत.

त्याचप्रमाणे नियमित मतदान केंद्राची संख्या दोन हजार ७९० आहेत. यात पनवेल विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक ५७४ मतदान केंद्रांचा समावेश आहे, तर कर्जत खालापूर मतदारसंघात ३६२, उरण मतदारसंघात ३५५, पेण मतदारसंघात ३८०, अलिबाग मतदारसंघात ३७५, श्रीवर्धन मतदारसंघात ३५१, महाड मतदारसंघात ३९३ मतदान केंद्र आहेत. या सर्व मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, प्रकाशयोजना, दिव्यांगांसाठी रॅम्पची व्यवस्था, व्हिलचेअरवरील दिव्यांगांसाठी योग्य रुंदीचा दरवाजा व फर्निचर इ. किमान सुविधा पुरविण्यात येणार आहेत. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सुरळीत पार पाडावी यासाठी सुमारे १७ हजार ४९७ इतक्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यात एकही अतिसंवेदनशील केंद्र नसल्याची माहिती या वेळी जिल्हाधिकारी यांनी दिली. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी अडीच हजार पोलीस तैनात केले जाणार आहेत.

जिल्ह्यामध्ये विधानसभा मतदारसंघांच्या निवडणुकीमध्ये वापरण्यात येणाऱ्या १३ हजार २८६ ईव्हीएम आणि व्हिव्हिपॅट मशीनची प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण करण्यात आलेली असल्याचे जिल्हाधिकारी जावळे यांनी स्पष्ट केले.

**पोलीस यंत्रणाही सज्ज**

ही निवडणूक निर्भय व मुक्त वातावरणात पार पडाव्यात या दृष्टिने चोख कायदा व सुव्यवस्था राखण्यात येणार आहे. त्या दृष्टिने राज्य पोलीस आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दल पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्ह्यात दोन हजार ६०० पोलीस कर्मचारी, ५०० होमगार्ड, तसेच केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या पाच कंपन्या तैनात केल्या जाणार आहे. निवडणूक शांततेत पार पडावी, यासाठी या कालावधीत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी या वेळी दिली.

अवैध पद्धतीने मद्य, रोख रक्कम वा इतर प्रलोभनांचा वापर होणार नाही याकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. बँकांमधून होणाऱ्या मोठ्या रकमांच्या व्यवहारांवरदेखील लक्ष ठेवण्यात येणार आहे असेही ते म्हणाले.

# खोपोलीत परतीच्या पावसाचा धुमाकूळ

## विजांच्या कडकडाटामुळे नुकसान



**खोपोली : प्रतिनिधी**

मागील आठ दिवस खोपोली व परिसरात परतीचा पाऊसाचा धुमाकूळ सुरू आहे. दररोज संध्याकाळी विजांचा कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळत आहे. परतीच्या पावसाने एका बाजूला हातातोंडाशी आलेल्या भातपिकाचे नुकसान होत असल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे.

दुसरीकडे रविवारी व सोमवारी विजांच्या कडकडाटामुळे खोपोलीतील अनेक नागरिकांच्या घरातील संगणक, टीव्ही, फ्रिज, पंखे व एसी नादुरुस्त होऊन मोठे नुकसान झाले आहे.

हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानंतर रविवारी व सोमवारी खोपोली शहरासह ग्रामीण भागात जोरदार विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला. विजांच्या कडकडाटामुळे अनेक नागरिकांच्या घरातील इलेक्ट्रॉनिक व इलेक्ट्रिक किमती साहित्य मोठ्या प्रमाणावर नादुरूस्त होऊन नुकसान झाले आहे.

मागील आठ–दहा दिवसांपासून दररोज दुपारनंतर परतीचा पाऊस तो ही विजांच्या कडकडाटासह मुसळधार पडत असल्याने नागरिकांची मोठी धावाधाव होत आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी किंवा नुकसान झाले नसल्याने हा एक दिलासा आहे, मात्र तयार व कापणीला आलेल्या भातपिकाचे मात्र या दररोजच्या पावसाने मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# माणगाव रेल्वेस्थानक सुशोभिकरणाचे लोकार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या माध्यमातून माणगाव रेल्वेस्थानकाचे सुशोभिकरण करण्यात आले. या कामाचे लोकार्पण मंगळवारी (दि.१५) सार्वजनिक बांधकाममंत्री रवीद्र चव्हाण, महिला बालविकासमंत्री आदिती तटकरे, सार्वजनिक बांधकाम अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड यांच्या ऑनलाईन उपस्थितीत पार पडले.



या वेळी नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष हर्षदा सोंडकर, कार्यकारी अभियंता महेश नामदे, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष निलेश थोरे, तहसीलदार दशरथ काळे, उपविभागीय अभियंता विजय बागुल, भाजप तालुकाध्यक्ष गोविंद कासार, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष काका नवगणे, महिला तालुकाध्यक्ष संगिता बक्कम, शहरध्यक्ष योगीता चव्हाण, नगर पंचायत मुख्याधिकारी संतोष माळी, रिक्षा युनियन अध्यक्ष संजय साबळे, व्यापारी संघटना अध्यक्ष रमेश जैन, उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी, उपअभियंता श्रीकांत गणगणे व रोहा आणि माणगावचे सर्व सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.

या वेळी ना. आदिती तटकरे यांनी, ऑनलाईन पद्धतीने या कार्यक्रमाला उपस्थित राहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांचे आभार मानले. महायुती सरकारमार्फत कोकणातील सर्व बसस्थानके, रेल्वेस्थानक यांचा कायापालट करण्यात आला आहे. सर्व सुखसुविधायुक्त रेल्वेस्थानक सुशोभिकरण करण्यात आले आहेत. बसस्थानक सुशोभिकरणाचे कामसुद्धा लवकरच सुरू करण्यात येईल, तसेच रेल्वेस्थानकावर जास्तीत जास्त गाड्यांना थांबा देण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन दिले.

# माथेरान शहरातील मुख्य रस्ते अंधारात

**माथेरान : प्रतिनिधी**

पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान शहरातील मुख्य रस्ते अनेक दिवसांपासून अंधारात असल्याने पर्यटकांना व नागरिकांना काळोखातून चाचपडत वाट शोधत जावे लागत आहे.

माथेरान पर्यटनस्थळी मागील काही दिवसांपासून परतीच्या पावसाने जोर धरला असून विजेचा लपंडाव सुरू आहे. माथेरानच्या मुख्य रस्त्यावरील पथदिवे बंद असून ठेकेदार याकडे दुर्लक्ष करीत आहे. गावातील गल्लीबोळातसुद्धा हिच परिस्थिती असल्याने काळोखातून ज्येष्ठ आणि लहान मुलांना पायी चालत जाणे खूपच त्रासदायक बनलेले आहे.



माथेरान जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असल्यामुळे येथे रात्री–अपरात्री केव्हाही पर्यटक येत असतात. दस्तुरीपासून गावांपर्यंत क्ले–पेव्हर ब्लॉकचे रस्ते असल्याने चालत येणे सोयीचे ठरते, परंतु महात्मा गांधी मुख्य रस्त्यावर नेहमीच बत्तीगुल असते.

रहदारीच्या रस्त्यावर सातत्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे खरेदीसाठी येणाऱ्या पर्यटकांना रात्रीच्या वेळी खरेदी करणे कठीण होते. त्यामुळे काहीही खरेदी न करता ते आपल्या हॉटेलमध्ये जातात याचा परिणाम इथल्या व्यापारी वर्गावर, लहानमोठ्या स्टॉल धारकांवर होतो.

यासाठी संबंधित खात्याने येथील समस्या मार्गी लावण्यासाठी कामे करावीत अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# माझेरी ग्रामस्थांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**मुरूड : प्रतिनिधी**

राजपुरी ग्रामपंचायतीमधील माझेरी गावातील ग्रामस्थांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

माझेरी गाव शेतकरी कामगार पक्षासोबत होते, परंतु या ठिकाणी कोणतीही विकासकामे होत नसल्याने अखेर आमदार महेंद्र दळवी यांचे नेतृत्व मान्य करीत शिवसेनेमध्ये प्रवेश केला आहे.



या वेळी आमदार दळवी यांच्या समवेत रायगड जिल्ह्याचे संघटक दिनेश मिणमिणे, शिवसेनेचे रायगड उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, समीर दोऊनाक आदी उपस्थित होते.

आमदार महेंद्र दळवी यांनी, माझेरी गावाचा विकास करण्यास मी कटिबद्ध असून माझ्यावर जो विश्वास दाखवला आहात तो मी सार्थक ठरवणार आहे. आपला कोणताही भ्रमनिरास होणार नाही. जास्तीत जास्त कामे मार्गी लावणार असल्याचे सांगितले. या वेळी जुवेद सिद्दिक, मारुफ मुल्ला, शारिक कादरी, तनवीर शेखानी, राहील हूर्जुक, हुझैफा हुर्जुक, अकरन मांडलेकर, अजमल माडलेकर आदींसह इतरांनी प्रवेश केला.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सुट्ट्या आल्याने मोठ्या संख्येने पर्यटक जिल्ह्यात दाखल झाले होते. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.


जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि.१४) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ३३९ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख २७ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.

# ज्येष्ठ उद्योजक स्व. रतन टाटा यांच्या हस्ताक्षरातील पत्र व्हायरल

**अलिबाग : प्रतिनिधी**

ज्येष्ठ उद्योजक स्व. रतन टाटा यांनी अलिबागच्या डॉ. संदीप केळकर यांना स्वहस्ताक्षरात लिहिलेले एक पत्र सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल झाले आहे. वरसोली येथील बंगल्यावरील कर्मचाऱ्याला श्वानदंशानंतर डॉ. केळकर यांनी दिलेल्या रुग्णसेवेबाबत त्यांनी आभार मानले होते.

हे पत्र टाटा यांनी ९ जानेवारी २००४ रोजी डॉ. केळकर यांना लिहिले होते. पत्रासोबत त्यांनी टायटन कंपनीचे एक घड्याळही डॉक्टरांना पाठवून दिले होते. वरसोली येथील समुद्रकिनाऱ्यावर स्व. रतन टाटा यांचा एक बंगला आहे. शनिवार आणि रविवारी ते सुट्टीसाठी येथे येऊन राहत असत. येताना आपल्या लाडक्या श्वानांना ते आवर्जून सोबत आणत असत.



जानेवारी महिन्याच्या सुरुवातीला त्यांच्या वरसोली येथील बंगल्यावरील एका कर्मचाऱ्याला श्वानदंश झाला. रात्रीची वेळ असल्याने या कर्मचाऱ्याला वैद्यकीय सेवा मिळणे अत्यंत गरजेचे म्हणून हा कर्मचारी जोगळेकर नाका येथे असलेल्या डॉ. संदीप केळकर यांच्या दवाखान्यात आला. त्याने आपण रतन टाटा यांच्याकडून आलो असून श्वानदंश झाला असल्याचे डॉ. केळकर यांना सांगितले. डॉ. केळकर यांनी तातडीने या जखमी कर्मचाऱ्यावर उपचार केले. त्याचे लसीकरण केले, मात्र उपचाराचे कुठलेही पैसे त्या कर्मचाऱ्याकडून घेतले नाही. रतन टाटा यांच्याकडून आले आहात, मग औषध उपचाराचे पैसे कसे घेणार? सांगून त्या कर्मचाऱ्याला परत पाठवले.

ही बाब जखमी कर्मचाऱ्याने रतन टाटा यांना सांगितली. तेव्हा रतन टाटा यांनी स्वहस्ताक्षरात पत्र लिहून डॉ. केळकर यांचे आभार मानले आणि नववर्षाची भेट म्हणून एक टायटन कंपनीचे हाताचे घड्याळ भेट म्हणून पाठवून दिले. डॉ. केळकर यांनी हे पत्र जपून ठेवले आहे. रतन टाटा यांनी लिहिलेले हे पत्र सध्या समाज माध्यमांवर चांगलेच व्हायरल झाले आहे.

# मध्य रेल्वेच्या १० कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापकांचा पुरस्कार

**रोहे : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे मंगळवारी (दि.१५)आयोजित कार्यक्रमात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरमवीर मीना यांनी मुंबई विभागातील सहा, भुसावळ विभागातील दोन आणि सोलापूर विभागातील दोन अशा १० मध्य रेल्वे कर्मचाऱ्यांचा सुरक्षा पुरस्काराने सत्कार केला.



ड्युटी दरम्यान त्यांनी दाखवलेली सतर्कता, मागील महिन्यांत ट्रेन परिचालनामध्ये सुरक्षा सुनिश्चित करण्यात त्यांनी दिलेले योगदान, अनुचित घटना टाळण्यात त्यांचे योगदान या बद्दल हे पुरस्कार देण्यात आले. या पुरस्कारामध्ये पदक, प्रशंसा प्रमाणपत्र, अनुकरणीय सुरक्षा कार्याचे प्रशस्तिपत्रक आणि रू. २००० रोख आहे.

या पुरस्कारात मुंबई विभागात डेप्युटी स्टेशन मॅनेजर सोमाटणे लक्ष्मण कुमार, कसारा अभिषेक कुमार, पनवेल ट्रेन मॅनेजर राजेश कुमार, ट्रॅक मेंटेनर शीव रामजीत यादव आणि ट्रॅक मेंटेनर शीव नंदा किशोर शिंदे, एमसीएम/टीआरएस/मेकॅनिकल कल्याण शाम जुगल किशोर; भुसावळ विभागात लोको पायलट/शंटर जळगाव इम्रान खान, एमसीएम/सीडब्ल्यू/ मेकॅनिकल भुसावळ मनोज चौधरी; सोलापूर विभागात पॉइंट्समन कलबुर्गी रमेश अर्जुन घनटी, संरक्षा समुपदेशक/इलेक्ट्रिकल सोलापूर दुर्गाचरण नागले आदींचा सन्मान करण्यात आला.

महाव्यवस्थापक धरमवीर मीना यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कर्तव्याप्रती सतर्कता आणि समर्पणाबद्दल त्यांचे कौतुक केले. या वेळी अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रभात रंजन, प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी चंद्रकिशोर प्रसाद, प्रधान मुख्य अभियंता रजनीश माथूर, प्रधान मुख्य परीचालन व्यवस्थापक एस. एस. गुप्ता, प्रधान मुख्य विद्युत अभियंता एन. पी. सिंग आणि मध्य रेल्वेचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# बालचित्रकारांच्या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि रियाज आर्ट ड्रॉईंग क्लास यांच्या वतीने दहिवली येथील यशोदा मंगल सभागृहात चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ५५० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या वेळी प्रमुख पाहुणे पं. स. माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगरसेवक संकेत भासे, ज्येष्ठ चित्रकार सुनील परदेशी, जनार्दन भासे, संदेश भासे आदी उपस्थित होते. आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन आणि प्रिया आर्ट ड्रॉइंग क्लासच्या वतीने प्रियंका भासे यांनी स्वागत केले. चांगली चित्र रेखटणाऱ्या तीन बालकलाकारांना पारितोषिके देण्यात आली. परीक्षक म्हणून चित्रकला सुनील परदेशी यांनी काम पाहिले. स्पर्धेला पं. स. माजी सदस्य मीना थोरवे, मनीषा थोरवे, लता थोरवे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत गट इयत्ता पहिली ते दुसरी प्रथम अर्पिता कोळी, द्वितीय निधी पवार, तृतीय रिदांत महाबळे; गट तिसरी ते चौथी प्रथम सांगवी कोळी, द्वितीय लावण्या चव्हाण, तृतीय साहिल देशमुख; गट पाचवी ते सातवी प्रथम देवांश शेळके, द्वितीय आशिष मंडक, तृतीय तन्मय शेठ; गट आठवी ते दहावी प्रथम प्रतीक पालवे, द्वितीय मुग्धा व्यापारी, तृतीय साक्षी दरेकर यांना गौरविण्यात आले.

# बँक अकाऊंट हॅक करणारा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

एका टोळीने ॲक्सीस बँकेतून फोन केल्याचे भासवून तसेच फिर्यादी यांचे व्हॉटसॲपवर ॲक्सिस बँक अधिकाऱ्याचे बनावट आयडी कार्ड पाठवुन फिर्यादीचा विश्वास संपादन केला. यानंतर फिर्यादीचे नेट बँकींग हॅक करून १४ लाख रुपयांचे पर्सनल लोन घेण्यात आले. त्यानंतर हे लोन डिॲक्टीवेट करण्याच्या बहाण्याने १४ लाखांची रक्कम इतर खात्यात वळवली. फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल सायबर सेलच्या पथकाने एकाला अटक केली आहे. हा गुन्हा कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला होता.




सायबर सेल, पनवेलच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपाली पाटील व पथकाने गुन्ह्यातील बँक व्यवहार विश्लेषण आणि क्लिष्ट तांत्रिक विश्लेषन केले असता गुन्ह्यातील संशयित आरोपीत टोळी ही दिल्ली येथुन ॲक्सीस बँक पर्सनल लोन फ्रॉड करीत असल्याचे निष्पन्न झाले. या आरोपींबाबत अधिक तपास करता गुन्ह्यातील एका आरोपीस दिल्ली येथुन सापळा रचुन शिताफिने अटक करण्यात आली. गुन्ह्यात आणखी तीन पाहिजे आरोपी आहेत. फरार आरोपींचा शोध सुरू आहे. अटक आरोपींकडे गुन्ह्यातील तांत्रिक पुरावे मिळुन आले असुन या टोळीस यापुर्वी सायबराबाद पोलिसांनी क्रेडीट कार्ड फ्रॉडमध्ये सन २०२३ मध्ये अटक केली होती, अशी माहिती मिळुन आली आहे तसेच टोळीने छत्तीसगड, तेलंगणा, महाराष्ट्र, येथे अशा प्रकारचे गुन्हे केल्याचे निष्पन्न होत आहे. पनवेल सायबर सेल, त्याअनुषंगाने पुढील तपास करीत आहेत.

ही कामगिरी पोलीस आयुक्त, मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय ऐनपुरे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ २ (पनवेल) प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपुत मार्गदर्शनाखाली ईएमसी, सायबर सेल, पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिपाली पाटील, सहाय्यक निरीक्षक रामचंद्र यमगर, हवालदार वैभव शिंदे, रमेश वैद्य, नाईक दादा माने, शिपाई नितीन जावरे, प्रगती म्हात्रे, दीपक चौधरी यांनी उघडकीस आणला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सायबर सेल, पनवेल वरिष्ठ पोलीस निरिक्षक दिपाली पाटील करीत आहेत.

### पोलिसांकडून नागरिकांना आवाहन

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत जनतेला आवाहन करण्यात येते की, ॲक्सिस बँक/बँकेतून पर्सनल लोन घेण्याकरिता आपणाशी कोणी मोबाईल वर संपर्क केला किंवा व्हॉटसॲपसारख्या समाजमाध्यमावर त्यांचे आयकार्ड पाठवून विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केल्यास अशा खोट्या बनावट आयकार्डवर/दस्तऐवजवर विश्वास ठेवून त्यांना ओटीपी शेअर करू नका, याबाबत माहिती घेऊन सतर्क राहून गुंतवणूक करावी.**

# रेल्वेत नोकरी देतो सांगून २० जणांना कोट्यवधीचा गंडा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतील रेल्वे प्रशासनात कारकून या पदावर नोकरी लावण्याच्या बहाण्याने तब्बल २० जणांना गंडा घातल्याची घटना खारघर पोलीस ठाण्यात सोमवारी नोंदविण्यात आली. या प्रकरणी खारघर पोलिसांनी सहा जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदविला असून सध्या हा भामटा फरार आहे.

खारघरमध्ये राहणाऱ्या संबंधित भामट्याने दोन वर्षांपूर्वी (ऑक्टोबर २०२२) कबड्डी शिकविण्याच्या निमित्ताने सूशिक्षित व क्रीडा क्षेत्रातील तरुणांच्या पालकांना गाठले. त्यांचा विश्वास संपादन केला आणि रेल्वेत कारकून म्हणून नोकरी लावतो असे भासवले. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराने १० लाख रुपये द्यावे लागतील, असेही सांगितले. लगेच नोकरी लागेल या अपेक्षेने पालकांनी संबंधित ४३ वर्षीय भामट्यावर विश्वास ठेवला. त्यानंतर या भामट्याने पालकांचा विश्वास दृढ होण्यासाठी रविवारी सुट्टीच्या दिवशी मुंबई चर्चगेट येथील रेल्वेच्या कार्यालयात पालकांच्या भेटीगाठी घेतल्या. रेल्वे कार्यालयातच भेट झाल्याने हा भामटा नोकरी लावेलच, असा विश्वास पालकांना वाटल्याने त्यांनी भामट्याने दिलेल्या बँक खात्यावर आणि रोख रक्कम या भामट्याला दिली.

यानंतर काही महिन्यांनी नोकरी कधी लागेल यासाठी भामट्याकडे विचारणा केली, मात्र तो अनेक कारणे देऊन नोकरी लावण्याचे टाळू लागला. अखेर पालकांना त्याच्यावर संशय आल्याने त्यांनी या भामट्याविषयी अधिक माहिती गोळा करण्याची सुरुवात केली. लया भामट्याने स्वीकारलेल्या पैशातून त्याने कोल्हापूर येथील त्याच्या मूळ गावी घर बांधल्याचे पालकांना समजल्यावर पालकांनी भामट्याला दिलेले एक कोटी ३१ लाख रुपये परत मागण्याची सुरुवात केली, मात्र दिलेले पैसे परत मिळत नाहीत याची खात्री झाल्यावर खारघर पोलीस ठाण्यात पालकांनी एकत्र येऊन मार्च महिन्यात याविषयी तक्रारी अर्ज दिला. या अर्जाची पडताळणी केल्यावर पोलिसांना ही फसवणूक असल्याचे प्रथम दर्शनी दिसले. त्यामुळे सोमवारी याबाबत खारघर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक वैशाली गलांडे यांनी रितसर गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले.

पालकांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यापासून हा भामटा व त्याची पत्नी फरार असल्याचे समजते. याबाबत अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पराग लोंढे हे करीत आहेत.



**पनवेल : भाजपचे ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, भाजप तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी तसेच भीमराव पोवार, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भूषण गायकवाड, प्रतिक म्हात्रे, किशोर नाईक, मोहन खतकर, अक्षय, रोशन नाईक, बबन म्हात्रे, अशु शेळके, तनीष नाईक, संदेश भोपी, कुणाल म्हात्रे आदी उपस्थित होते. सर्वांनी दशरथ म्हात्रे यांचे अभीष्टचिंतन केले.**

## गव्हाण विद्यालयात डॉ. कलाम यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन ऑफ इंडिया भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.



विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांच्या शुभहस्ते भारतरत्न डॉ.ए.पी.जे.कलाम अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, गणेश भोईर, ग्रंथपाल महेश म्हात्रे, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील, दर्शना भोईर आणि विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी लक्ष्य गायकवाड या विद्यार्थ्याने डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित अत्यंत सुंदर भाषण केले.

डॉ.ए.पी.जे.कलाम यांचा जयंती दिन वाचन प्रेरणा दिन म्हणूनही साजरा करण्यात येतो. त्याप्रमाणे ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडसे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ग्रंथपाल महेश म्हात्रे व ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे उपस्थित आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## ‘सीकेटी’मध्ये बौद्धिक संपदा अधिकार विषयावर कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये सोमवारी (दि.१४) बौद्धिक संपदा अधिकार (आयपीआर) या विषयावर अत्यंत माहितीपूर्ण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय पॉलिटेक्निक कॉलेज, अहमदनगर येथील मेकॅनिकल इंजिनीअरिंगचे व्याख्याते डॉ. दादाभाऊ करंजुळे उपस्थित होते. कार्यशाळेत ऑरगॅनिक आणि नालिटिकल केमिस्ट्री, मायक्रोबायोलॉजी आणि बायोटेक्नॉलॉजी चे पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. करंजुळे यांच्या या विषयातील कौशल्याने विद्यार्थ्यांना बौद्धिक नवकल्पनांचे संरक्षण कसे करावे आणि पेटंट्स आणि कॉपीराइटच्या आसपासच्या कायदेशीर चौकटींमध्ये नेव्हिगेट कसे करावे याची सखोल माहिती मिळाली. तसेच विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रात आयपीआरचे महत्त्व आणि परिणाम याबद्दल मौल्यवान मार्गदर्शन मिळाले.

रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बी.व्ही. जाधव यांनी त्यांच्या भाषणादरम्यान, रसायनशास्त्र विभागाच्या उपलब्धी आणि दृष्टीकोनांची रूपरेषा सांगितली त्याचबरोबर शैक्षणिक उत्कृष्टता आणि अत्याधुनिक संशोधनासाठी विभागाच्या वचनबद्धतेवर जोर दिला. कार्यशाळेचे समन्वयक व रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. डी. के. पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि पदव्युत्तर विभागाची विद्यार्थिनी निकिता सबत हिने कार्यशाळेचे आभार प्रदर्शन केले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. बी.व्ही. जाधव, कार्यशाळेचे समन्वयक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



**पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात भारताचे ११वे राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायुक्त प्रसेनजित कार्लेकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

## चाकूचा धाक दाखवून चोरी

**पनवेल :** डिलिव्हरी कुरिअर सेंटर या कंपनीच्या कार्यालयात घुसलेल्या एका लुटारूने कर्मचाऱ्याला चाकूचा धाक दाखवून कार्यालयात जमा झालेली एक लाख ४७ हजाराची रोख रक्कम लुटून पसार झाल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे. खारघर वसाहतीमधील सेक्टर २० येथे असलेल्या डिलिव्हरी कुरिअर सेंटर या कंपनीच्या कार्यालयात नुर इस्माल नुर अली मलिक हा एकटा असताना त्या कार्यालयात एक अज्ञात लुटारू घुसला व त्याने त्याला चाकूचा धाक दाखवून कार्यालयातील टेबलच्या ड्राव्हरमधील एक लाख ४७ हजार रुपयांच्या नोटा तसेच नुर अली याचा मोबाईल घेऊन तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## गोडाऊनमधून गोण्यांची चोरी

**पनवेल :** गोडाऊनमध्ये चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अनिकेत आमले हे डायघर येथे राहत असून ते हायरिंग डिपार्टमेंटचे डेप्युटी मॅनेजर या पदावर आहेत. किरवली, अडवली गाव, धानसर गाव फाटा मुंब्रा-पनवेल रोड येथे पत्र्याचे शेडचे गोडाऊन आहे. त्या ठिकाणी भाड्याने देण्यात येणारे मटेरियल ठेवत असतात. त्या ठिकाणच्या कामगारांनी गोडाऊन मध्ये ठेवलेल्या मालापैकी काही माल दिसून येत नसल्याचे त्यांना सांगितले. चोराने शेडच्या पत्र्याच्या खालील बाजूस असलेल्या मोकळ्या जागेतून आत प्रवेश केला आणि गोडाऊनमध्ये ठेवलेल्या मालापैकी ६५ गोण्या मालाची चोरी केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# सीकेटी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राध्यापक विवेक पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाचन महत्त्वाचे मौलिक विचार आपल्या भाषणातून सांगितले. निधी मोरे हिने डॉ. कलाम यांच्याविषयी माहिती सांगितली. अक्षरा सावंत हिने वाचनाचे महत्त्व आपल्या भाषणातून व्यक्त केले.



विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ’दररोज एक पान, महिन्याला एक पुस्तक आणि वर्षाला १२ पुस्तके वाचावित हा संदेश देणारी छोटी नाटिका राधिका शिर्के मॅडम यांच्या मार्गदर्शनाने सादर केली. सारिका दिवेकर यांनी सुत्रसंचालन केले. ’वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे’ या उद्देशाने घेण्यात आलेला ’वाचन प्रेरणा दिवस’ उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉक्टर ए पी जे अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. १५) पनवेल तालुक्यातील सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यम आणि प्राथमिक विभागाच्या पुढाकाराने हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी इंग्रजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलम शिंदे, ग्रंथपाल निलेशा पाटील, बिना नायर, अनघा भोसले, योग्यानी माने आधी उपस्थित होते. या वेळी मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, वाचनाचे महत्त्व पटवून देताना त्यांनी आजच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या व्यक्तिरिक्त अवांतर वाचन होणे आवश्यक आहे.

अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांना अनेक संदर्भ मिळतात आणि त्यांची आकलन शक्ती वाढते तसेच इतरांवरही आपल्या ज्ञानाचा प्रभाव टाकण्यासाठी अवांतर वाचनाचा उपयोग होतो. म्हणूनच वाचन प्रेरणा दिवसामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत विकास होण्यास तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवण्यास मदत होईल असा विश्वास मुख्याध्यापका नीलिमा शिंदे यांनी व्यक्त केला.



## फुंडे हायस्कूलमध्ये वाचन प्रेरणा दिन

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि.१५) भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅन, थोर शास्त्रज्ञ, भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून पुस्तके उपलब्ध करून देऊन वाचन उपक्रम घेण्यात आला. इयत्ता सातवी ब चा वर्गाने वर्गशिक्षक दिगंबर पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाची छान तयारी केली होती. सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील यांनी डॉ कलाम यांचे संशोधन, त्यांचे कार्य, विचार याबाबतीत विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. प्रार्थनेच्या वेळेला सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक देऊन वाचन करून घेण्यात आले.



या वेळी विद्यालयाचे प्राचार्य एम.जी. म्हात्रे, स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू, ज्येष्ठ शिक्षिका साधना पाटील, एस. डी. म्हात्रे, महावाचन विभाग प्रमुख आर.जी. शेळके, दिगंबर पाटील आणि सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

## संपादकीय

# रंगतदार निवडणुकीकडे लक्ष

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र आणि झारखंड यांच्या विधानसभा निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा मंगळवारी केली. महाराष्ट्रातील अनेक महत्त्वपूर्ण राजकीय घडामोडींनंतरची ही पहिलीच विधानसभा निवडणूक असल्यामुळे ती सर्वच राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते यांच्यासाठी खूपच आव्हानात्मक असून जनतेसाठीही ती उत्कंठावर्धक आहे. त्यातच महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेसोबतच इतर अनेक लोकोपयोगी योजनांचा व विकासकामांचा धडाका लावल्याने निवडणुकीतील रंगत आणखी वाढली आहे.

**महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांची घोषणा अखेर मंगळवारी झाली. गेले अनेक दिवस सगळ्यांनाच या घोषणेची प्रतिक्षा होती. एकाच दिवशी म्हणजे २० नोव्हेंबर रोजी संपूर्ण राज्यात या निवडणुकीचे मतदान होणार आहे. लोकसभा निवडणुकांच्या वेळी महाराष्ट्रातील मतदान सात टप्प्यांमध्ये पार पडले होते. त्यावेळी विरोधकांकडून त्यासंदर्भात टीका झाली होती. आता निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीचे मतदान एकाच टप्प्यात पार पाडण्याची घोषणा केली आहे. अर्थात तरीही विरोधकांनी काही त्याबद्दल किंवा कशाही बद्दल आनंद व्यक्त केलेला नाहीच. राज्यात २३ नोव्हेंबर २०२४ला या निवडणुकीतील मतमोजणी होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणुकीची तारीख जाहीर करण्यासोबतच आजपासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू होणार असल्याची घोषणाही केली. महाराष्ट्रात यंदा एकूण ९ कोटी ६३ लाख मतदार असून यात महिला मतदारांची संख्या ४ कोटी ६६ लाख तर पुरुष मतदारांची संख्या ४ कोटी ९७ लाख इतकी आहे. महायुती सरकारने जाहीर केलेल्या 'लाडकी बहीण योजने'ला महिलांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला असून त्यामुळे यंदा महिला मतदारांचा कौल मोठ्या प्रमाणात महायुतीला मिळेल असे दिसते आहे. याचाच सर्वाधिक धसका विरोधकांनी घेतला असून सातत्याने या योजनेच्या पुढील अंमलबजावणीबाबत गैरसमज पसरवण्याचे काम विरोधकांकडून केले जात आहे. एकंदरच महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेसोबतच तीन मोफत गॅस सिलिंडर, शेतकऱ्यांसाठी वीज बिल माफी यांसारख्या अनेक लोकोपयोगी योजनांची घोषणा आणि विकासकामांच्या भूमीपूजनाचा धडाका लावल्याने विरोधकांचे धाबे दणाणले आहे. हरियाणातील पराभवानंतर काँग्रेस पक्षाची तर बोलतीच बंद झाली असून तेथे भारतीय जनता पक्ष सलग तिसऱ्यांदा सत्तेवर आल्याने राज्यातील भाजपच्या नेत्या-कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. उद्धव ठाकरे यांच्यावर नुकतीच अँजिओप्लास्टीची सर्जरी झाल्याने ते प्रचारात नेमके कधी आणि कितपत सहभागी होऊ शकतील याबाबतही विरोधकांच्या गोटात चिंतेचे वातावरण आहे. ऑक्टोबरच्या १५ तारखेला निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर होऊन २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. म्हणजे जवळपास ३५ दिवस राजकीय पक्षांना प्रचारासाठी मिळणार आहेत. तरीही विरोधकांनी प्रचारासाठी कमी दिवस मिळणार असल्याचा नकारात्मक सूरही आयोगाच्या घोषणेनंतर लावलाच. राज्यात विधानसभेचे एकूण २८८ मतदारसंघ असून राज्यभरात एकूण १ लाख १८६ मतदारकेंद्रे असणार आहेत. महाराष्ट्रासोबत विधानसभा निवडणुकांना सामोऱ्या जाणाऱ्या झारखंडमध्ये १३ आणि २० नोव्हेंबरला मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. तेथेही २३ नोव्हेंबरलाच मतमोजणी होईल. यापूर्वी २०१४ आणि २०१९च्या विधानसभा निवडणुकांमध्ये राज्यातील जनतेने भाजपला भरभरून यश दिले आहे. याही निवडणुकीत सारे मिळून महायुतीच्या विजयाचा जल्लोष करूया असे आवाहन आयोगाच्या निवडणुकीच्या घोषणेनंतर देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला केले. यंदाच्या निवडणुकीत प्रत्येक लढत रंगतदार होणार असल्याने सगळ्यांचेच लक्ष या निवडणुकीकडे लागले आहे.**

# कोजागरीचं शीतल चांदणं असतं आरोग्यदायी!



शरद ऋतूतील आश्विन महिना. आश्विन महिन्यातील आश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागरी पौर्णिमा किंवा शरद पौर्णिमा. ह्या पौर्णिमेला अजूनही बरीच नावे आहेत. बंगाली लोक याला लोख्खी पुजो म्हणतात तर कुणी कौमुदी पौर्णिमादेखील म्हणतात.

कोजागिरी पोर्णिमा ! कोऽजार्गति? कोऽ जार्गति? म्हणजे कोण जागे आहे ?, कोण जागृत त आहे? असे विचारीत दुर्गा देवी सर्वत्र फिरते असे म्हणतात. नवरात्राचे नऊ दिवस शक्ति बुध्दिच्या दैवताचे आराधान करावे. विजया दशमीला विजय संपादनासाठी सीमोल्लंघन करावे. त्यानंतर येणारी ही पौर्णिमा! शेतीची कामे अर्ध्यावर झालेली, शेतातील पिके वाऱ्यावर डोलू लागलेली, चार महिन्यांचा पावसाळा संपत आलेला. काही भागात नवीन पिके हाताशी आलेली आहेत. अनेक भागातील ही नवात्र पोर्णिमा!

या दिवशी प्रत्येक कुटुंबातील ज्येष्ठ अपत्याला ओवाळून त्याची किंवा तिची आश्विनी साजरी करतात. रात्री उशिरापर्यंत गप्पा-गोष्टी करत, रास व गरबा खेळत, आठवनीतील गाणी गात सर्वजण जागरण करतात. दूध आटवून बदाम, केशर, पिस्ता वगैरे सुकामेवा घालून लक्ष्मीदेवीला नैवेद्य दाखविला जातो आणि ते मसाला दूध मग प्राशन केले जाते. चंद्र आपल्या सौम्य प्रकाशात सबंध पृथ्वीला न्हाऊ घालत असतो.

कोजागरी पौर्णिमेच्या अनेक कथा आहेत, त्यापैकी एक अशी सांगितली जाते की, एकदा एक राजा आपले सगळे वैभव्य आणि संपत्ती गमावून बसतो.त्याची राणी महालक्ष्मीचे व्रत करते आणि लक्ष्मी देवी प्रसन्न होऊन तिला आशीर्वाद देते आणि त्या राजाचे वैभव त्याला परत मिळते. असं म्हणतात की महालक्ष्मी मध्यरात्री या चंद्रमंडलातून उतरून खाली पृथ्वीवर येते. ती चांदण्यांच्या प्रकाशात अमृतकलश' घेऊन प्रत्येकालाच विचारते, की को जागर्ति...? को... जागर्ति...?' म्हणजे आपल्या कर्तव्याला कोण जागृत आहे का? कुणी जागं आहे का? अन् तिच्या हाकेला साद देण्यासाठी सगळेच जागे राहतात. मग तिची वाट पाहणाऱ्या, साद देणाऱ्या सगळ्यांना ती अमृत' म्हणजे लक्ष्मीचं वरदान देते, धनधान्य, सुखसमृद्धी देते.

शरद ऋतूमध्ये हवामानात बरेच बदल घडून येत असतात..एकीकडे उन्हाळा संपत असतो आणि दुसरीकडे हिवाळा सुरू होत असतो. दिवसा गरम आणि रात्री थंडी पडते. दूध पिल्यामुळे पित्त प्रकोप कमी होतो. याच कारणामुळे बहुतेक पौर्णिमेच्या रात्री मसाला दूध पिण्याची प्रथा आहे. कोजागरीचं शीतल चांदणं अंगावर घेतलं, की मनःशांती, मनः शक्ती, उत्तम आरोग्य लाभतं.

अशा या संपन्नतेमध्ये शरद पोर्णिमेला शबरीचा जन्म झाला. शबरी कोण होती? कोणी म्हणजे ती शबर राजाची कन्या होती. कोणी तिच्या वनवासी भिल्ल समाजाची असण्यावर भर देतात. कोणाला मातंग ऋषींसमोर अध्यात्मिक आस पूर्ण करण्यासाठी गुरू उपदेश घेणारी शबरी भावते. तर कोणाला आपल्ल्या दैवताला जे आहे ते, प्रसंगी उष्टी बोरे देऊनही समर्पित होणारी बशरी आठवते. कोणाला सीतेच्या शोधार्थ निघालेल्या दशरथ नंदन राम लक्ष्मणांना मार्गदर्शन करणारी शबरी आठवते. किती विविध रूपे! सगळीच अनुकरणीय आणि म्हणूनच आदर्शवत रूपे !! चला तर मग कोजागरी साजरी करूया मसाला दूध पिऊया धम्माल करूया !!!

**(साभार : विकासपिडीया)**

# भारतीय नाटककार गोविंद पुरुषोत्तम देशपांडे

गो.पु. देशपांडे अर्थात गोविंद पुरुषोत्तम देशपांडे हे एक मराठी नाटककार, कवि आणि निबंधलेखक होते. त्यांचा जन्म रहिमतपूर येथे २ ऑगस्ट १९३८ रोजी झाला. आज त्यांचा स्मृतीदिन (१६ ऑक्टोबर २०१३) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



सातारा जिल्ह्यातील रहितमतपूर हे त्यांचे गाव. त्यांना शाळेत घातल्यावर देशपांडे यांनी दीड वर्षातच पहिली ते तिसरी हा अभ्यास पुरा केला होता. रहिमतपूरहून ते १९५४मध्ये मॅट्रिक झाले, आणि पुढील शिक्षणासाठी बडोद्याला आणि नंतर दिल्लीला गेले. तेथे जवाहर नेहरू विद्यापीठातून त्यांनी चीन हा विषय घेऊन पीएच.डी.केली. हाच विषय घेऊन त्यांनी हाँगकाँग येथून एक पदविका मिळवली. त्यांचा मराठी संतकवींसकट इतर कवींच्या साहित्याचा चांगला अभ्यास होता. ते दिल्ली विश्वविद्यालयातून राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाल्यावर ते पुण्यात स्थायिक झाले होते. ते चिनी भाषा-तज्ज्ञ होते, आणि भारत-चीन राजकीय संबंधाचे जाणकार होते.

जर्नल ऑफ आर्ट्‌स न्ड आयडियाज ह्या नियतकालिकाचे ते संस्थापक संपादक होते. शिक्षण बोर्डाचे आणि 'चायना रिपोर्ट'चे ते सभासद होते. गो.पु. देशपांडे यांचे आजोबा आणि आई-वडील ही सर्व मंडळी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात उतरलेली. वडील डॉक्टर होते आणि त्यांचा रहिमतपुरात दवाखाना होता. गो. पुंचा धाकटा भाऊ दिलीप आणि त्याच्याहून धाकटी बहीण ज्योती सुभाष. ज्योती सुभाष आणि त्यांची कन्या अमृता सुभाष या दोघीही लेखिका आणि अभिनेत्री आहेत. गो.पु. देशपांडे यांची कन्या प्रा.डॉ. अश्विनी देशपांडे या दिल्लीत अर्थशास्त्राच्या प्राध्यापक आहेत. गोपुंच्या चिरंजीवांचे नाव सुधन्वा आहे.

गो.पु. देशपांडे यांनी इंग्रजी-मराठीत वैचारिक, रंगभूमीविषयक, राजकीय आणि साहित्यविषयक लेखन भरपूर केले. प्रायोगिक नाट्यलेखनाच्या प्रवाहात गो.पु. देशपांडे यांनी विचारनाट्याची धारा पहिल्यांदा निर्माण करण्याचा यत्न केला. राजकीय जाणिवा ही या लेखनामागची प्रेरणा आहे. गो.पु. देशपांडे हे अनेक राजकीय चळवळींचे साक्षीदार होते; पूर्वी काहीसे संबंधितही होते. जाणतेपणाने त्यांनी राजकीय चळवळींचा अभ्यास केला होता, त्यामुळे त्यांच्या नाटकातील विचारांना आणि आशयाला एक प्रकारची विश्वासार्हता होती.

**गो.पु. देशपांडे यांनी लिहिलेली मराठी नाटके आणि इतर वाङ्मय**

अंधारयात्रा (नाटक), अस्सा नवरा सुरेख बाई (नाटक), इत्यादी इत्यादी कविता (कवितासंग्रह), उध्वस्त धर्मशाळा (नाटक), एक वाजून गेला आहे (नाटक), चर्चक निबंध (भाग १, २) (निबंधसंग्रह), चाणक्य विष्णूगुप्त (नाटक), द वर्ल्ड ऑफ आयडियाज इन मॉडर्न मराठी (इंग्रजी पुस्तक), मामकाः पाण्डवाश्चैव (नाटक), रस्ते (नाटक), रहिमतपुरकरांची निबंधमाला भाग १, २ -नाटकी निबंध (लेखसंग्रह), शेवटचा दिस (नाटक. हिंदीतसुद्धा रूपांतरित), सत्यशोधक (नाटक; हिंदीतसुद्धा रूपांतरित)

**गो.पु. देशपांडे यांना मिळालेले पुरस्कार**

जयवंत दळवी पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासनाचा अनंत काणेकर पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९९६), रूपवेध प्रतिष्ठानचा तन्वीर सन्मान (मरणोत्तर, २०१३)

**(साभार : विकीपीडिया)**



## बदलते तंत्रज्ञान

# कोणत्या कंपनीकडे आहे स्वस्त नेटफ्लिक्स प्लॅन?

भारतातील अमॅझोन प्राइम व्हिडीओ (Amazon Prime Video) आणि डिस्ने प्लॅस हॉटस्टार (Disney Plus Hotstar)च्या तुलनेत नेटफ्लिक्सचे (NetfliX) प्लॅन्स थोडे महाग आहेत. त्यामुळं बहुतेक लोक अशा रिचार्ज प्लॅन्स शोधत असतात. ज्याद्वारे त्यांना मोफत नेटफ्लिक्स (Free Netflix) ॲक्सेस मिळू शकेल.



रिलायन्स जिओ (Jio), एअरटेल (Airtel) आणि व्होडाफोन-आयडिया (Vi) या तिन्ही टेलिकॉम कंपन्यांकडे प्रीपेड ग्राहकांसाठी नेटफ्लिक्स प्लॅन्स उपलब्ध आहेत. अर्थात, रिलायन्स जिओ, व्होडाफोन-आयडिया आणि एअरटेल या तिन्ही कंपन्या नेटफ्लिक्ससह प्लॅन ऑफर करत आहेत. नेटफ्लिक्ससोबत कोणत्या टेलिकॉम कंपनीचा सर्वात स्वस्त प्लॅन मिळेल? या संदर्भात जाणून घ्या...


रिलायन्स जिओचा सर्वात स्वस्त नेटफ्लिक्स १२९९ रुपयांचा प्लॅन आहे. जिओ १२९९ रुपयांच्या प्लॅनमध्ये, तुम्हाला दररोज २ जीबी डेटा, १०० एसएमएस आणि मोफत कॉलिंगसह ८४ दिवसांची व्हॅलिडिटी मिळते. दरम्यान, या प्लॅनसह तुम्हाला नेटफ्लिक्स मोबाईल प्लॅनमध्ये मोफत ॲक्सेस दिला जाईल.

आयडिया-व्होडाफोनकडे सर्वात स्वस्त प्लॅन नेटफ्लिक्स प्लॅन आहे, या प्लॅनची किंमत ११९८ रुपये आहे. आयडिया-व्होडाफोनच्या ११९८ प्लॅनसोबत कंपनी दररोज २ जीबी डेटा, अनलिमिटेड फ्री कॉलिंग, दररोज १०० एसएमएस आणि ७० दिवसांची व्हॅलिडिटी दिली जाते. एक्स्ट्रा बेनिफिट्सबद्दल बोलायचे झाल्यास, हा प्लॅनसोबत बिंज ऑल नाईट, वीकेंड डेटा रोलओव्हर (सोमवार ते शुक्रवारदरम्यान शिल्लक असलेला दैनंदिन डेटा तुम्ही वीकेंड दरम्यान वापरू शकता), डेटा डिलाईट आणि नेटफ्लिक्स (टीव्ही आणि मोबाइल) चे फ्री ॲक्सेस दिले जाते. या प्लॅनमध्ये फ्री नेटफ्लिक्स बेसिस सबस्क्रिप्शन (Netflix Basic Subscription) ७० दिवसांसाठी मिळते.

एअरटेलकडे नेटफ्लिक्स प्लॅन आहे, पण एअरटेलचा प्लॅन जिओ आणि आयडिया-व्होडाफोनपेक्षा जास्त महाग आहे. एअरटेल १९९८ प्लॅनमध्ये मोफत नेटफ्लिक्स बेसिक, दररोज ३ जीबी डेटा, मोफत कॉलिंग आणि दररोज १०० एसएमएस दिले जातात. याशिवाय, एअरटेल एक्स्ट्रीम, अपोलो २४/७ सर्कल मेंबरशिप आणि फ्री हॅलो ट्यूनमध्ये प्रवेश उपलब्ध आहे.

# राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते दादासाहेब केतकर

राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते विष्णू गंगाधर ऊर्फ दादासाहेब केतकर यांचा आज स्मृतीदिन (१६ ऑक्टोबर १९५०) आहे. दादासाहेब केतकर यांचा जन्म (९ एप्रिल १८८७) मुंबईमधील फणसवाडी चाळीत झाला. दादा दोन वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले. दादांचे थोरले बंधू माधुकरी मागत. त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चाले.



## निमित्त

प्राथमिक शिक्षणानंतर मुंबईतील प्रभू सेमिनरी शाळा, रॉबर्टमनी विद्यालय व विल्सन हायस्कूल येथे त्यांचे इंग्रजी पाचवीपर्यंतचे शिक्षण झाले. वडील बंधूंना पुण्यात नोकरी मिळाली. दादा त्यांच्याबरोबर पुण्यात आले. पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाले.

राष्ट्रीय बाण्यामुळे त्यांनी इंग्रज सरकारची नोकरी न करता स्वतंत्रपणे सामाजिक कार्य करता त्यागपूर्वक जीवन देशकारणी लावायचे असा निर्धार केला. त्यानंतर दादांना १९०६मध्ये लोकमान्य टिळकांचे शिष्य म्हणजेच दादासाहेब खापर्डे यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. विदर्भातील वास्तव्यात दादांच्या आयुष्याला नवी दिशा लाभली. त्या काळात सरकार विरुद्ध प्रजा असा संघर्ष सुरू होता. वंगभंगाच्या चळवळीतून राष्ट्रीय शिक्षण देणारी विद्यालये व मोठमोठ्या पाठशाळा निर्माण झाल्या. या स्वदेशीच्या वातावरणाने समाज ढवळून निघत होता. इंग्लंडहून येणाऱ्या मालाप्रमाणेच इंग्रज राज्यकर्त्यांच्या मदतीने चाललेल्या शिक्षणसंस्थांवरही बहिष्कार घातला जात होता. यातूनच महाराष्ट्रात तळेगाव व त्या वेळच्या वऱ्हाडमधील अमरावती व यवतमाळ येथे राष्ट्रीय शाळा स्थापन झाल्या. यवतमाळ येथील 'विद्यागृह' शाळेत दादा प्राथमिक शिक्षक म्हणून काम करू लागले. दर रविवारी विद्यार्थी व दादा शाळेसाठी मदत (भंडारा) जमा करीत.

विद्यागृह संस्थेने १९१४ मध्ये 'अनाथ विद्यार्थी गृह पाठशाला' हा उपक्रम सुरू केला. संस्थेचा विस्तार चिंचवड येथे झाला. दादा पुण्याच्या संस्थेत काम पाहू लागले. १९२० च्या दरम्यान संस्थेचे माजी विद्यार्थी डॉ. ग.श्री. खैर व ना.वि. उर्फ मामा पेंडसे आजीव सदस्य झाले. डॉ. खैर व डॉ. नानासाहेब परुळेकर ह्यांनी दादांच्या समवेत महाराष्ट्र विद्यालय सुरू केले. त्याला औद्योगिक शिक्षणाची जोड दिली. संस्थेचा विस्तार व्हावा म्हणून चाललेल्या दादांच्या प्रयत्नांतून देणग्या मिळत गेल्या. संस्थेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी संस्थेचा छापखाना असावा अशी दादांची इच्छा होती. याच सुमारास म्हणजे १९२९मध्ये शं.रा. तथा मामा दाते त्यांच्या लोकसंग्रह छापखान्यासह संस्थेत आले. शालोपयोगी व इतर पुस्तकांचे प्रकाशन सुरू झाले. संस्थेला फायदा होऊ लागला. अनेक सुबक वळणाचे टाईप तयार होऊ लागले. महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर उसळलेल्या दंग्यात हा छापखाना आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. दादांनी मोठ्या हिमतीने तो परत उभा केला.

१९३०च्या कायदेभंगाच्या चळवळीचा फायदा घेऊन संस्थेने विद्यार्थ्यांच्या मनावर राष्ट्रीय जागृतीचे संस्कार केले. दादांनीही पुनः पुन्हा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय शिक्षणाचा संस्कार अधिकाधिक दृढ केला. संस्थेच्या वाटचालीत चढ-उतार येत गेले. पण दादांनी अतिशय दूरदर्शीपणाने तिचा विकास घडवून आणला. दादा म्हणजे अनाथ विद्यार्थीगृह व अनाथ विद्यार्थीगृह म्हणजे दादा असे समीकरण तयार व्हावे इतके दादा संस्थेशी एकरूप झाले. पुढे १९७७ मध्ये मुंबईत घाटकोपर येथे संस्थेने आपली शाखा सुरू केली. १९७८मध्ये मुद्रण शिक्षण, मुक्तांगण इंग्लिश शाळा, बालरंजन केंद्र, वृद्धाश्रम - शतायुभवन, तळेगाव येथे चौथी शाखा, क्रीडा संकुल, नव्या मुंबईत संकुल, उच्च शिक्षणासाठी सहा महाविद्यालये असा विस्तार झाला.

**-मल्हार अरणकल्ले**

## क्लिक...क्लिक...!



**पोलादपूर : शासनाच्या पाणी अडवा पाणी वाचवा अभियानाचा खरा अर्थ या आदिवासी जोडप्याला समजला आहे. लाकडे व पालापाचोळा वापरून पाणी अडवण्याचे काम पोलादपूरजवळील गावात सुरू आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# लवकरपेक्षा उशिरा उठणे चांगले? तज्ज्ञ सांगतात...

अनेकजण रात्री उशिरापर्यंत जागे राहतात आणि सकाळी उशीरा उठतात. आपल्याला लहानपणापासून घरात लवकर झोपा लवकर उठा असे शिकवले जाते, मात्र एका नवीन संशोधनात असं समोर आलंय की, लवकर उठण्यापेक्षा उशिरा उठणे चांगले आहे. चांगली झोप तुम्हाला आतून बरे करू शकते आणि पुढील दिवसासाठी तुमच्या शरीराला ऊर्जा देऊ शकते.



न्यूरोसायन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार असे आढळून आले की, जे उशिरापर्यंत झोपतात ते बुद्धिमत्ता, तर्कशक्ती आणि स्मरणशक्तीच्या चाचण्यांमध्ये चांगले गुण मिळवतात. या विषयी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना हैदराबादच्या अपोलो हॉस्पिटल्सचे सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांनी सविस्तर माहिती दिली आहे. डॉ कुमार सांगतात दोन प्रकारचे लोक असतात, एक जे व्यक्ती लवकर झोपणे आणि लवकर उठणे पसंत करतात तसेच त्यांच्या क्रियाकलापांचे नियोजन करतात.

दुसरे म्हणजे, उशिरा झोपणे आणि उशिरा उठणे पसंत करतात तसेच त्यांचे नियोजन करतात. रात्री १२ च्या आधी झोपणे गरजेचे आहे, मात्र हल्ली बरेच जण बारा वाजल्यानंतर झोपतात. याचा अर्थ, जेव्हा लोक झोपेचं चुकीचं वेळापत्र फॉलो करतात तेव्हा ते चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरतात. संशोधनानुसार उशिरा उठल्यानं काही गोष्टींमध्ये आपल्याला फायदा होत असला तरीही नुकसान हे मोठ्या प्रमाणात होतं.

डॉ. कुमार म्हणाले, सात ते नऊ तास झोपण्याची शिफारस केली जाते. सात तासांपेक्षा कमी किंवा नऊ तासांपेक्षा जास्त झोप घेतल्यास एखाद्या व्यक्तीला लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका आणि काही प्रकरणांमध्ये कर्करोग यांसारखे आजार होण्याचा धोका असतो; तर एखाद्या व्यक्तीला चांगल्या झोपेपेक्षा कमी झोप मिळत असेल तर अशा प्रकरणांमध्ये धोका जास्त असतो, असे डॉ. कुमार म्हणाले.

फोनच्या व्यसनामुळे आणि सोशल मीडिया आणि टीव्ही पाहण्याच्या सवयीमुळे आजकाल बहुतेक लोक रात्री उशिरापर्यंत जागे राहतात, त्यामुळे त्यांना चांगली झोप लागत नाही आणि आरोग्यावर वाईट परिणाम होतो. मध्यरात्री झोप लागते असं तुमच्याही बाबतीत होत असेल तर अशा परिस्थितीत झोपण्यापूर्वी काही सोपे व्यायाम केल्याने तुम्हाला चांगली झोप येऊ शकते, यामुळे स्नायूंना आराम देण्यासोबतच शरीर लवचिक होण्यासही मदत होते.

# मोकाट कुत्री अन् रस्त्यावरील खड्ड्यांनी खोपोलीकर बेजार

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरात मागील काही दिवसांपासून मोकाट कुत्री व जागोजागी रस्त्यांवर पडलेले खड्डे या दोन्ही समस्यांनी शहरवासीय प्रचंड हैराण झाले आहेत.

शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या अचानकपणे वाढली आहे. यातील काही कुत्री पिसाळली असल्याने त्यांच्याकडून विद्यार्थी व नागरिकांवर हल्ला करून जखमी करण्यात येत आहे. नगरपालिकेकडे निर्बिजीकरणासाठी किंवा कुत्र्यांना बंदिस्त ठेवण्यासाठी कोणतीही यंत्रणा नसल्याने ही समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. ६ ऑक्टोबरपासून एक आठवडा शहरातील प्राणीमित्र व सामाजिक संस्थेच्या माध्यमातून मोकाट कुत्र्यांना अँटीरेबीज लसीकरण करण्याची मोठी



मोहीम राबविण्यात आली, मात्र याबाबत प्रशासनातर्फे ठोस उपाययोजनेची मागणी होत आहे. दुसरी समस्या जागोजागी रस्त्यांवर पडलेले खड्डे. या खड्ड्यांमुळे शहरात विविध ठिकाणी अपघात घडत आहेत. खड्ड्यांत दुचाकी अपटल्याने अनेक नागरिकांना पाठीची दुखापत होऊन वेगळ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. शहरातील आपत्कालीन मदतीसाठी सक्रिय ग्रुप व अन्य काही सामाजिक संस्था आपापल्या स्तरावर समस्यांचा पाठपुरावा करीत आहेत. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

**मागील आठवड्यात विशेष मोहिमेंतर्गत शहरातील मोकाट कुत्र्यांना अँटीरेबीज लसीकरण करण्यात आले आहे. या मोहिमेत सामाजिक संस्था व पालिका प्रशासन ही सहभागी होते.**

**-गुरुनाथ साठेलकर,**
**सामाजिक कार्यकर्ते, खोपोली**

**रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत लवकरच दुरुस्ती कामे सुरू होतील. परतीच्या पावसामुळे कामाला उशीर झाला आहे.**

**-डॉ. पंकज पाटील,**
**मुख्याधिकारी, खोपोली**

## मुद्रे खुर्द गावाच्या स्मशानभूमीचे भूमिपूजन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील मुद्रे खुर्द गावासाठीच्या स्मशानभूमीचे भूमिपूजन शिवसेना शहरप्रमुख अभिषेक सुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी शिवसेना कक्ष उपजिल्हाप्रमुख उदय शिंदे, माजी नगरसेवक कृष्णा घाडगे, महिला आघाडी शहर प्रमुख भारती शिंदे, शरद म्हसे, किशोर कदम, ज्ञानेश्वर कर्णूक, प्रदिप वायकर, राजन मुसळे, नामदेव मोरे, मयुर मोरे, संजय शिंदे, मालती शिंदे, राजेश्री हजारे आदी उपस्थित होते.


MAHATRANSCO

## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-57/24-25 7000034126 | Work of chemical resistant coating of ICT at 220kV Apta, 220kV Taloja & 100kV Thal substation, under EHV (O&M) Dn. Panvel under EHV (O&M) Circle, Panvel. Tender Fee **Rs. 500/- +GST** | **Rs. 32.50 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 14.10.2024 to 21.10.2024 up to 11:00 hrs, Opening date:-21.10.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर


## गेल कंपनीविरोधातील काम बंद आंदोलन स्थगित

### व्यवस्थापन व प्रकल्पग्रस्त समितीची मागण्यांवर चर्चा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

उसर गेल कंपनी व्यवस्थापन व संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीच्या चर्चेनंतर विविध मागण्या मंजूर झाल्याने तूर्तास कामबंद आंदोलन मागे घेत असल्याचे समितीचे अध्यक्ष निलेश गायकर यांनी सांगितले. प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीसंदर्भात चर्चा शासन दरबारी होणार असून काही दिवसांत याबाबत बैठक घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

संयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीच्या वतीने गेल कंपनीविरोधात सोमवारी(दि.१४)कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले होते. व्यवस्थापन दिशाभूल करीत आहे व



प्रकल्पग्रस्तांच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप निवेदनात केला होता. पोलिसांनी कंपनी व्यवस्थापन व आंदोलन समिती यांच्याशी संवाद साधून चर्चा घडवून आणली. आंदोलन समितीने व्यवस्थापन अधिकारी अनुप गुप्ता व मॅनेजर जितिन सक्सेना आदी अधिकारी वर्गासमोर प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या ठेवल्या. या मागण्या कंपनी व्यवस्थापनाने सोडविण्याचे आश्वासन दिले. अखेर आंदोलन समितीचे अध्यक्ष निलेश गायकर यांनी तूर्तास कामबंद आंदोलन मागे घेत असल्याचे म्हटले.

या ठिकाणी पोलिसांनी वडखळ दंगल नियंत्रण पथकाला बंदोबस्तासाठी पाचारण केले होते. उपविभागीय पोलीस अधिकारी विनित चौधरी, अलिबाग पोलीस निरीक्षक साळे, मुरूड सहाय्यक निरीक्षक देशमुख, रेवदंडा सहाय्यक निरीक्षक श्रीकांत किरविले, उपनिरीक्षक नंदगावे, नायब तहसीलदार संदिप जाधव, अलिबाग विभाग विजय मापुसकर, मंडळ अधिकारी चव्हाण, खानाव तलाठी आकाश गोसावी आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी भूखंड मालक श्री. हरिश्चन्द्र दामू पाटील यांच्याकडून खालील वर्णनाच्या भूखंडाचे हक्क कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर भूखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**भूखंडाचे वर्णन.**

| मौजे | तालुका | जिल्हा | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र चौ.मी.हे.आर.पॉ. | पो.ख. | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| सांगडे | पनवेल | रायगड | ६२ | ०.२४.७० | ०.०१.३० | ०.२६.०० |

सदर वर नमूद भूखंडातील हक्क हे आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणाऱ्या भूखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : १६/१०/२०२४**

**सही/-**
**पॉल लीगल असोसिएट**
ऑफिस नंबर ३०१, तिसरा मजला, ओम साई बिल्डिंग, प्लॉट नंबर १०१/३, स्वामी नित्यानंद रोड, गार्डन हॉटेल जवळ,पनवेल, रायगड, ४१०२०६
Email: info@paullegalassociates.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे - अरिवली, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं/ हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ११७/२ | ०-१७-०० पो.ख. ०-०१-२० **एकूण ०-१८-२० पैकी ०-१६-३०** | ३.१६ | **जगदिश मारुती खाने संगीता आत्माराम खाने अस्मिता आत्माराम खाने नेहा आत्माराम खाने** |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि.१५/१०/२०२४.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१

## नांगुर्ले रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाचे भूमिपूजन

**कर्जत** : तालुक्यातील पळसदरी ग्रामपंचायतीमधील नांगुर्ले गावातील कॉंक्रीटच्या रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. त्यामुळे या गावातील ग्रामस्थांना या रस्त्याचा चांगला लाभ होणार आहे.

आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या माध्यमातून मिळालेल्या जिल्हा नियोजन विकास निधीमधून पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील नांगुर्ले येथील राहुल धामणसे यांच्या घरासमोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. भाजप तालुकाध्यक्ष राजेश भगत किसान यांच्या हस्ते या रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, तालुका उपाध्यक्ष स्वप्निल खांबाळे, तालुका सरचिटणीस वसंत महाडिक, सहकार आघाडीचे तालुकाध्यक्ष रामदास शेलार, नांगुर्ले बूथ अध्यक्ष राहुल धामणसे, युवा मोर्चाचे कोषाध्यक्ष शुभम शिंदे आदींसह नांगुर्ले ग्रामस्थ उपस्थित होते.



## ''नोटीस''

**विषय:- उशिरा जन्म नोंद करणेबाबत.**

संदर्भ :- अर्जदार सौ.आयशा जावेद शेख ( लग्नानंतरचे नाव) कु. आयशा अब्बास शेख ( लग्नापुर्वीचे नाव) रा. तळोजा, ता.पनवेल, जि. रायगड यांचा दि. ०४/०९/२०२४ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार सौ.आयशा जावेद शेख ( लग्नानंतरचे नाव) कु. आयशा अब्बास शेख ( लग्नापुर्वीचे नाव) रा. तळोजा, ता. पनवेल, जि. रायगड यांनी उशिरा जन्म नोंदीचा आदेश मिळणेकामी कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक ०८/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर जन्म नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २७/०९/२०२४

**सही/-**
**(संजय भालेराव)**
प्र. निवासी नायब तहसलिदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पनवेल

पत्र.क्र.मशा/प्रशा-१/उशिरा जन्म नोंद नोटीस/२०२४/२४१/२०२४

## निविदा (टेंडर)

वास्तुसिध्दी लॅन्डमार्क रिव्हर-साईड गृहनिर्माण संस्था पोयंजे, ता : पनवेल, जिल्हा :- रायगड येथे खालील कामाचे निविदा (टेंडर) मागवीत आहे.

१) सफाई कामगार - (HK)-
२) सुरक्षा रक्षक-(S.G) -
३) S.T.P. प्लैन्ट -
४) लिफ्ट -
५) सोसायटी मॅनेजर-

वरील कामची निविदा हया संस्थेच्या कार्यालयात जाहीरात दिल्यापासून १५ दिवसाच्या आत कार्यालयीन वेळेत सिल बंद जमा कराव्यात.

संपर्क : ९००४१४०१६५, ७७१५९१५८३४.

**सही/-**
**सचिव**
वास्तूसिध्दी लॅन्डमार्क रिव्हरसाईड को-ऑप. हौ. सोसायटी लि. सर्वे नं. ८८/० आणि ९०/२, पोयंजे गाव, ता, पनवेल, जिल्हा-रायगड-४१०२२१.
(रजि. नं. आरजीडी / पिडब्ल्यूएल / एचएसजी / (टीसी) / ३४१९/२०१७-१८)

## पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा

(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता -नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र-४००७०४
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India
Address: Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-400704

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/फॅक्स-022-27222132, | ई-मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205 |
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112 |

वैबसाइट - https://nadkaranja.kvs.ac.in ईमेल: kvkaranja@gmail.com

**साक्षात्कार सूचना /Walk-In Interview**
**अविलंब चाहिए URGENTLY REQUIRED**

केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष 2024-25 हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है -

| पद का नाम | न्यूनतम योग्यता |
|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक** (Post Graduate Teachers) **अर्थशास्त्र, अंग्रेजी** | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी) एवं बी.एड डिग्री |

**साक्षात्कार दिवस :** 21.10.2024 **(सोमवार)**
**पंजीकरण समय :** 8:00 AM TO 10:00 AM
**नोट :** अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

**सही/-**
**प्राचार्य**
**पीएम श्री केवि एन.ए.डी. करंजा**
**प्राचार्य/Principal**
**केंन्द्रीय विद्यालय/Kendriya Vidyalaya**
**एन.ए.डी. करंजा / NAD Karanja**
**जिला-रायगढ़ (महाराष्ट्र)/Dist.-Raigad (MH)**

## महाराष्ट्र शासन

### जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग
### हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

**दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१** — **फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८**
ई-मेल :- collector.raigad@maharashtra.gov.in — **ई-मेल :-** dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)**/CCTV Web casting /२०२४ — **दि. १४/१०/२०२४**

### विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४
### ई निविदा सुचना क्रमांक ०२/२०२४

CCTV Camera (Webcasting Enabled) भाडे तत्वावर पुरवठा बाबत ई निविदा सूचना

**विधानसभा सार्वत्रिक** निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने करीता संपूर्ण प्रक्रिये दरम्यान रायगड जिल्हयातील ७ विधानसभा मतदार संघामध्ये प्रत्यक्ष निवडणूकीच्या दिवशी (Poll Day) २७९० मतदान केंद्रांच्या ५०% म्हणून १३९५ मतदान केंद्रांवर प्रत्येकी **२ असे एकूण साधारणतः २७९० कॅमेरे व मतमोजणीच्या दिवसासाठी** ७ विधानसभा मतदार संघात प्रत्येकी १५ याप्रमाणे **एकूण १०५ कॅमेरे तसेच मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र** यांचेकडील पत्र क्र. ईव्हीएम- २०२३/प्र.क्र.५०१/२३/३३ दिनांक ०९/०९/२०२४. मध्ये दिलेल्या निर्देशानुसार **वेबकास्टिंगचा दर प्रति मतदान केंद्र रक्कम रुपये ६,२५३/- (टेस्टिंग आणि वेबकास्टींग सर्व दिवसांसाठी मतदान केंद्राबाहेरील व आतील + मनुष्यबळ**+GST+LED rent यासह.) प्रमाणे तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड यांच्या कडील आदेशानुसार CCTV Camera (Webcasting Enabled) वेबकास्टींगसह व इतर अनुषंगिक साहित्य सुविधा / सेवा पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यात ई-निविदा प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येत आहे.

**कामाचे नाव :-** रायगड जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **CCTV Camera (Webcasting Enabled) वेबकास्टींगसह व इतर अनुषंगिक साहित्य परवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. १ कोटी ५० लक्ष |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ३२,०००/- (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू. ३,२०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. ४,५०,०००/- |
| ई- निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० वाजता |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. १५/१०/२०२४ सकाळी ११.०० पासून ते दि. २१/१०/२०२४ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. १७/१०/२०२४ सकाळी ११.०० वाजता |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २१/१०/२०२४ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई-निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. २२/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

**सही/-**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी,**
**रायगड**

# नौदल अधिकाऱ्याची फसवणूक

## पत्नीने घेतले जमिनीवर परस्पर कर्ज ▌ सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नौदल अधिकारी नोकरीनिमित्त देशाबाहेर असताना त्यांच्या पत्नीने त्यांच्या नावे असलेल्या जमिनीवर परस्पर कर्ज घेतले. हे कर्ज घेताना बँक अधिकारी आणि अन्य एका व्यक्तीला हाताशी धरले. याबाबत माहिती पतीला मिळताच नौदल अधिकाऱ्याने पत्नी आणि बँक अधिकाऱ्यांविरोधात तक्रार दाखल केली. सीबीडी पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

नेहा हुडा, अमृता बोडखे अशी आरोपींची नावे आहेत. अन्य एकाचे नाव अद्याप उघड झालेले नाही. अमृता बोडखे या एसबीआय बँकेत कर्ज अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नेहा या फिर्यादी विश्वास दलाल यांच्या पत्नी आहेत. विश्वास दलाल हे नौदलात लेफ्टनंट कमांडर पदावर कार्यरत आहेत. विश्वास हे नोकरी निमित्त रशिया येथे गेले असता या तिन्ही आरोपींनी मिळून फिर्यादीच्या अपरोक्ष त्यांच्या पुणेनजीक हिंजेवाडी येथील जमिनीवर ४० लाखांचे संयुक्त गृहकर्ज घेतले व ते विकासकाला दिले.

हे करत असताना फिर्यादीच्या परस्पर बँकेतून बनावट व्यक्तीच्या हाताचे ठसे घेत नोटीस ऑफ इन्टिमेशन पाठवली, मात्र ही माहिती फिर्यादी विश्वास यांना मिळू नये म्हणून आरोपीने स्वत: मोबाइल क्रमांक आणि बनावट ई-मेल बनवून तो कर्ज अर्जात नमूद केला. त्यामुळे कर्जाबाबत माहिती फिर्यादी यांना न जाता फिर्यादी यांची पत्नी आणि बनावट इ मेलवर माहिती गेली. त्याला आरोपींनीच मंजुरी दिली व कर्ज मिळताच ते विकासकाच्या खात्यात वर्ग करण्यात आले.

फिर्यादी हे जेव्हा भारतात आले त्यावेळी त्यांना हा सर्व प्रकार कळला. त्यांनी ताबडतोब याबाबत सीबीडी पोलीस ठाण्यात आरोपींच्या विरोधात तक्रार अर्ज दाखल केला. त्याची शहानिशा करीत आरोपींच्या विरोधात फसवणूक अफरातफर आदी कलमान्वये गुन्हा नोंद केला आहे.

# कोकण भवनात पुस्तक प्रदर्शन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन कोकण विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांच्या हस्ते मंगळवारी (दि.१५) करण्यात आले.

कोकण विभागाचे मराठी भाषा संचालनालय, विभागीय माहिती कार्यालय आणि विभागीय आयुक्त यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम करण्यात आला.

या वेळी मुंबई व कोकण विभागीय सहाय्यक भाषा संचालक योगेश शेट्ये, एम.डी.शहा महिला महाविद्यालयाचे माजी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.राजाराम जाधव, प्रा.डॉ.किशोर देसाई, प्रा.राजेंद्र शिंदे, कोकण विभागाच्या सहायक संचालक संजीवनी जाधव, उपसंपादक प्रविण डोंगरदिवे, भाषा संचालनालयाचे अधीक्षक विजय हसुरकर तसेच कोकण भवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यासाठी कोकण भवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या प्रांगणात विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. हे प्रदर्शन १६ ऑक्टोबर २०२४ पर्यंत राहणार आहे. प्रदर्शनाची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ६ अशी आहे.

वाचन प्रेरणादिनानिमित्त आज भाषा संचालनालयामार्फत पुस्तक अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या वेळी डॉ.गणेश मुळे, प्रा.डॉ. राजाराम जाधव, प्रा.डॉ.किशोर देसाई, प्रा.राजेंद्र शिंदे या मान्यवरांनी अभिवाचन केले.

भाषा संचालनालयामार्फत प्रकाशीत करण्यात आलेल्या विविध प्रकाशनांचा समावेश या पुस्तक प्रदर्शनात करण्यात आला आहे. कोकण भवनात येणारे नागरीक आणि विशेषत: कोकण भवनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या पुस्तक प्रदर्शनास आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन मुंबई व कोकण विभागीय सहाय्यक भाषा संचालक योगेश शेट्ये यांनी या वेळी केले.

## निवडक

### कामाचे पैसे मागितल्याने मारहाण

**पनवेल :** कामाचे पैसे मागितले असता त्याचा राग आल्याने ब्लेडने छातीवर मारून दुखापत केल्याप्रकरणी लवंकुश तनोजिया याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संजय यादव हा उत्तर प्रदेश येथील असून तो धारावी येथे नातेवाईकांकडे राहतो. रोहिंजण येथे राहणारा त्याचा गावाचा लवंकुश टीहूल तनोजिया यांच्याकडे तो आला होता. रात्री दहा ते अकराच्या सुमारास रोहिंजण गावात लवंकुशच्या भंगाराच्या दुकानासमोर त्याने कामाचे पैसे मागितले व मी गावी जातो असे सांगितले. या गोष्टीचा राग आल्याने लवंकुश याने शिवीगाळ व धमकी देऊन हातात ब्लेड घेतली आणि डाव्या छातीवर मारून संजय याला जखमी गेले.

### भंडाऱ्यात खुर्चीवरून हाणामारी

**नवी मुंबई :** दिघा येथील श्रीराम सेवा संस्थेच्या वतीने देवी स्थापनेनिमित्ताने शुक्रवारी रात्री सामूहिक अन्नदानाचे (भंडारा) आयोजन केले होते. त्या ठिकाणी जेवण्यासाठी आलेली व्यक्ती व रस्त्यालगतच्या घरात राहणारे कुटुंबीय यांच्यात दारासमोर लावण्यावरून वाद झाला. खुर्ची वाद विकोपाला जाऊन त्यांच्यात हाणामारी झाली असता त्यात कोयत्याचादेखील वापर केला. त्यामुळे दोन गट तयार होऊन त्यांच्यात तुंबळ हाणामारी झाली. त्यामध्ये गोपाळ यादव हा जखमी झाला आहे. देवी विसर्जनाच्या एक दिवस अगोदरच हा प्रकार घडल्याने परिसरात दोन दिवस तणावाचे वातावरण होते, तर या घटनेप्रकरणी दोन्ही गटांच्या विरोधात रबाळे एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये फिजिकल रिहॅबिलिटेशन सेंटरचे उद्घाटन

**पनवेल : प्रतिनिधी**

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईने रुग्णांची काळजी घेणारे अत्याधुनिक फिजिकल रिहॅबिलिटेशन सेंटर सुरू केले आहे.

ब्रेन स्ट्रोक, रस्त्यावरील दुर्घटना, कार्डियाक आजारांतून रिकव्हर होत असलेल्या रुग्णांना मदत करणे हा या सेंटरचा उद्देश आहे. कोणत्याही रुग्णाच्या रिकव्हरी दरम्यान रिहॅबिलिटेशनच्या भूमिकेचे महत्त्व या सेंटरने अधोरेखित केले आहे. नवीन सेंटरमध्ये प्रगत तंत्रज्ञान आणि नवीन थेरपीज आणल्या आहेत, ज्यामध्ये अनवेइंग सिस्टीमदेखील आहे.

नवीन सेंटरमधील सर्वसमावेशक रिहॅबिलिटेशन सेवा अनेक प्रकारच्या आजारांमध्ये सहायक ठरतात, ज्यामध्ये स्ट्रोक रिकव्हरी, कार्डियाक रिहॅबिलिटेशन, ऑर्थोपेडिक समस्या,



ब्रेन आणि स्पायनल कॉर्डला होणाऱ्या दुखापती आणि खेळांदरम्यान होणाऱ्या दुखापती यांचा समावेश आहे. महिलांच्या आरोग्यासाठी विशेष देखभाल, ऑपरेशननंतर ऑन्कोलॉजी फिजिओथेरपी आणि पीडियाट्रिक रिहॅबिलिटेशन यामुळे सर्व रुग्णांना व्यक्तिगत आणि उच्च श्रेणीची देखभाल मिळते. रिहॅबिलिटेशनला आरोग्य देखभालीचा चौथा स्तंभ मानले जाते. आणीबाणीची परिस्थिती, आपत्ती आणि आजारांच्या काळात रिहॅबिलिटेशन सेवा उपलब्ध होणे किती महत्त्वाचे आहे ते समजते.

फिजिकल रिहॅबिलिटेशन सेंटरच्या उद्घाटनावेळी कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलचे फिजिकल मेडिसिन आणि रिहॅबिलिटेशनचे हेड आणि डायरेक्टर डॉ.अभिषेक श्रीवास्तव, हॉस्पिटलच्या सिनियर फिजिओथेरपिस्ट डॉ. दीपिका तावडे आदींनी सेंटरची माहिती दिली.

# पिरकोन डोंगरावर लागवड केलेल्या झाडांचे संवर्धन

**उरण : वार्ताहर**

सदाबहार दोस्ती गृप प्रतिष्ठान-उरण यांच्या श्रमदान शिबिरातून मे ते जूनमध्ये पिरकोन काशे डोंगरावर वृक्षारोपण केलेल्या ६५ झाडांची रविवारी (दि. १३) रिंगण पद्धतीने हाताच्या व नंतर ग्रास कटरच्या साह्याने भविष्यात लागणाऱ्या वणव्यापासून सुरक्षितता करून ठेवण्यात आली.

कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यासाठी पाहणी करण्यासाठी गेले असता गवताची उंची २ ते ३ फुट झाली होती. घनदाट गवतातून मार्ग काढत सर्व झाडांची पाहणी करून झाली. १०० टक्के जगली आहेत. सारडे विकास मंच आणि कोमनादेवी ऑक्सिजन पार्कचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे सर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदान शिबिरातून वृक्ष संवर्धन केले आहे. सारडे विकास मंचतर्फे करण्यात आली.

मनोर जोशी सदाबहार दोस्ती गृप प्रतिष्ठानचे अध्यक्ष तुकाराम गावंडसर, संतोष जोशी, सचिन पाटील, हरिशचंद्र म्हात्रे, विजय गावंड, अरूण म्हात्रे, कामेश्वर म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, कैलास पाटील, निहार म्हात्रे, सुभाष गावंड, जय जनार्दन क्रिऐशन संस्था यांचे अध्यक्ष धनंजय म्हात्रेसर व सर्व सभासद हजर राहून श्रमदान केले.



### कळंबोलीत चॉकलेटचे आमिष दाखवून बालिकेवर अत्याचार

**पनवेल : वार्ताहर**

चॉकलेटचे आमिष दाखवून कळंबोलीमध्ये रविवारी सकाळी साडेअकरा वाजता एका दुकानदाराने नऊ वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. या घटनेची रितसर तक्रार पालकांनी कळंबोली पोलीस ठाण्यात नोंदविली आहे.

पिडीत बालिका ही कळंबोलीत राहते. तीच्या आईने दिलेल्या तक्रारीनंतर या घटनेला वाचा फुटली. दुकानामध्ये चॉकलेटचे आमिष दाखवून संशयीत आरोपीने बालिकेला दुकानात घेतले. त्यानंतर तीच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. याबाबत बालिकेने घरी पालकांना सांगितल्यावर पोलीस ठाण्यात ४८ वर्षीय आरोपीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र कदम यांनी याप्रकरणी आरोपीविरुद्ध बालकांचे लैंगिक छळ आणि शोषण कायद्याअंतर्गत कारवाई केली.

# मोरा शाळेत गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**उरण : वार्ताहर**

सेवा सहयोग फाऊंडेशन मुंबई यांच्याकडून गुरुवारी उरणमधील मोरा येथील प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथीपर्यंतच्या सर्व गरीब, गरजू विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षी सेवा सहयोग फाऊंडेशन मार्फत ९२ स्कूल किट दप्तरे व शैक्षणिक साहित्य पेन्सिल, कंपास पेटी, वह्या, कलर बॉक्स, पाटी आधी साहित्यांचे वाटप करण्यात आले.

सेवा सहयोग फाउंडेशनचे पदाधिकारी सुषमा शिंदे, विशाल देसाई, दिपाली देवळे, आकाश गुप्ते, राम रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना मोफत दप्तरांचे (स्कूल कीटचे)वाटप करण्यात आले. या दप्तरांचे वाटप करण्यासाठी सेवा सहयोग फाऊंडेशन संस्थेचे प्रतिनिधी सुषमा शिंदे असिस्टंट मॅनेजर, स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांना दप्तराच्या किटचे वाटप केले.

प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड यांनी आपल्या मनोगतातून म्हटले की, या शाळेमध्ये आज गरीब गरजू विद्यार्थी मोफत शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवले जातात. त्यापैकीच एक उपक्रम म्हणजे दप्तरे व शैक्षणिक साहित्याचा वाटप हे वाटप सेवा सहयोग फाऊंडेशन मुंबई या फाऊंडेशनने केल्यामुळे त्यांचे शाळेच्या वतीने आभार व्यक्त केले. माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक माननीय सुधीर मुंबईकर यांनी आपल्या मनोगतातून सेवा सहयोग फाउंडेशनच्या कार्याबद्दल माहिती सांगितली व दप्तराचे किट



देणाऱ्या फाऊंडेशनचे आभार मानले.

माध्यमिक शाळेचे वरिष्ठ शिक्षक श्री मनोज म्हात्रे यांनी आपल्या मनोगतामधून सेवा सहयोग फाउंडेशनच्या वेगवेगळ्या उपक्रमाबाबत पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सेवा सहयोग फाउंडेशनच्या सुषमा शिंदे यांनी आपल्या मनोगतामधून सेवा सहयोग फाऊंडेशन राबवत असलेल्या उपक्रमाबद्दल माहिती दिली, पण नवीन नवीन उपक्रम आम्ही विद्यार्थ्यांसाठी राबवत असतो अशी कल्पना दिली तसेच विद्यार्थी व पालकांना सेवा सहयोग फाउंडेशन दप्तराचा किट का देते या संदर्भात योग्य माहिती दिली. तसेच कार्यक्रम प्रसंगी पालकांमधून देखील मनोगत व्यक्त करण्यात आले पालकांनी देखील सेवासयोग फाऊंडेशनचे आभार व्यक्त केले

या वेळी श्री. आदिनाथ केंद्रे सेवा सहयोगचे विज्ञान शिक्षक, माध्यमिक शाळेचे चेअरमन पी. एम. कोळी, प्राथमिक शाळेचे चेअरमन चंद्रकांत कोळी, प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड, सहाय्यक शिक्षक सुगिंद्र म्हात्रे, अनिल पाटील, मनोज म्हात्रे, स्वप्निल नागमोती, शिंदे मॅडम, घरत मॅडम, सुनीता पाटील, राणी कदम, सुप्रिया मुंबईकर, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधिर मुंबईकर, रूपाली चौधरी, रेश्मा कोल्हे, ममता गवस शिक्षक, विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात दहावी, बारावी बोर्ड परीक्षेचे फॉर्म भरण्यास प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता दहावी आणि बारावी मधील बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२५ ला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे आवेदन पत्र भरण्याचे दोन स्वतंत्र शुभारंभ कार्यक्रम झाले.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२५ ला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवेदन पत्र भरणे शुभारंभ कार्यक्रम झाला. या वेळी स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य विश्वनाथ कोळी यांचेसह ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजय घरत, शिक्षक पालक संघाचे माजी उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, सुहास भगत तसेच विद्यालयाचे प्राचार्य



गोवर्धन गोडगे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, इयत्ता दहावी अ,ब,क आणि ड या चारही वर्गांचे वर्गशिक्षक अनुक्रमे चित्रलेखा पाटील, सागर रंधवे, संदीप भोईर व योगिता पाटील आणि विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी तर सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले.

इयत्ता बारावीच्या शिक्षक पालक मेळाव्यातच विद्यार्थ्यांचे एच.एस.सी.बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२५ साठी आवेदन पत्र भरण्याचा शुभारंभ स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे तसेच ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी, माणिक घरत, अर्चना पाटील, जयवंती ठाकूर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सर्व विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

इयत्ता दहावी व बारावी वर्गातील आपल्या पाल्यांनी परीक्षेत काय प्रगती केली आहे किंवा त्यांची अभ्यासातली प्रगती कशी आहे याचा आढावा पालकांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांच्या चाचणी परीक्षेमधील लेखी उत्तरपत्रिका पालकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आल्या आणि त्यावर विद्यार्थी व पालकांनाही मार्गदर्शनपर चर्चा करण्यात आली.

### सव्वा दोन लाखांची घरफोडी

**नवी मुंबई :** जुहूगाव येथे दोन लाख १९ हजाराच्या घरफोडीची घटना घडली आहे. परिसरात राहणारे श्रीकांत मोरे यांचे घर बंद असताना हा प्रकार घडला आहे. अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यामध्ये घरातील दागिने व रोकड असा दोन लाख १९ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

# एनआरआय संकुलात आग

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील सर्वांत उच्चभ्रू वसाहत समजल्या जाणाऱ्या नेरूळ येथील एनआरआय कॉम्प्लेक्स मधील ४७ व्या इमारतीच्या १७ व्या मल्यावरील सदनिकेला आग लागली होती.

अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार येथे कोणी राहत नसल्याने आग कशामुळे लागली तसेच नेमकी किती वाजता लागली हे समोर आले नाही. वाशी अग्निशमन दलाचे ग्रांटो गाडी पोहचली त्यानंतर आग विझवण्यास सुरूवात झाली. नऊच्या सुमारास आग आटोक्यात असून आसपासच्या सदनिका रिकाम्या करण्यात आल्या आहेत. दिवसभर ही आग विझविण्याचे काम सुरू होते.

# कळंबोलीत रंगला खेळ पैठणीचा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या प्रतिष्ठान मार्फत लाडक्या बहिणींसाठी व नारीशक्तीचा सन्मान करण्यासाठी खास 'खेळ पैठणीचा' खेळ मनोरंजनाचा या कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (दि.१३) सुधागड हायस्कूलच्या सभागृहात अभूतपूर्व उत्साही वातावरणात पार पडला.

रामदास शेवाळे प्रतिष्ठान आयोजित 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमात महिलांनी उत्साहाने सहभागी नोंदविला. दिलेला टास्क पूर्ण करणे अन् सोबतीला संगीताचा ठेका अशा उत्साहात स्पर्धा रंगली. या सोहळ्या प्रारंभी उद्घाटन सोहळ्यात व्यासपीठावर अध्यक्षस्थानी आमदार प्रशांत ठाकूर, रामदास शेवाळे, रेखा शेवाळे, शहर प्रमुख तुकाराम सरक, श्रीकांत फाळके, पंकज सुर्यवंशी, निलेश दिसले, विराट पवार,आनंदा माने, हिरकणी



सामाजिक सेवा संस्थेच्या अध्यक्ष सायली सरक यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन सोहळ्यानंतर स्पर्धेला सुरुवात झाली. शेकडो महिला स्पर्धकांनी यात सहभाग घेतला.

स्पर्धेत शेवटपर्यंत टिकून राहणाऱ्यांना विजेते घोषित करण्यात आले. विजेत्यांचा पैठणी देऊन गौरव करण्यात आला. सदर स्पर्धा व पैठणीचा खेळ काजल माने, सुप्रिया फाळके, सविता चव्हाण, राजश्री सुर्यवंशी, कोमल गोडसे, अर्पिता दिसले यांच्या सहभाग व मेहनतीने यशस्वी झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवी मुंबई मधील प्रसिद्ध समालोचक प्रशांत पुजारी यांनी केले.

## निवडक

### रायगड नाभिक समाज संघाची बैठक



**नागोठणे** : रायगड जिल्हा नाभिक समाज संघांचे अध्यक्ष दिनेश मोरे व कार्यकारिणीचा कार्यकाल पूर्ण झाल्यामुळे नवीन कार्यकारिणीची निवडी व समाजाच्या काही समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी सोमवारी (दि.१४) विश्वस्त अनिल पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. येत्या २ डिसेंबर रोजी अध्यक्षांसह ११ जणांची निवड समिती करणार आहे. प्रत्येक इच्छुक उमेदवाराने तालुकाध्यक्षांचे शिफारस पत्र आणणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले. बैठकीत जिल्हाध्यक्ष दिनेश मोरे, उपाध्यक्ष प्रमोद जाधव, योगेश शिर्के, सचिव महेंद्र माने, सहसचिव संतोष पवार, अनिल पवार, संतोष जाधव, सोपान मोहिते, शेखर घाडगे, विजय साळुंखे, शामकांत नेरपगार, प्रवीण खराडे, शैलेश रावकर, प्रवीण पवार, महेंद्र मोरे, राजेश खराडे, दिगंबर खराडे, रविंद्र टके, सुधाकर निंबाळकर, संजय सकपाळ, नरेश मोहिते, किरण मोहिते, महेश मोहिते, सचिन दिवेकर, जयंत शिंदे, राहुल कडव, किशोर खंडागळे, प्रेम खराडे, रुपेश साळुंखे, राकेश सकपाळ, दिलीप कदम, दिपक दिवेकर, राजु दिवेकर, रमेश खराडे, महेंद्र जाधव, कांता हुजरे, अजित हुजरे आदी उपस्थित होते.



**नागोठणे : राष्ट्रवादीचे नेते व सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार अनिकेत तटकरे यांना वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादीचे विभागीय नेते भाई टके, डॉ. राजेंद्र धात्रक, हरीश काळे, शहराध्यक्ष बाळासाहेब टके, प्रियदर्शनी संस्थेचे अध्यक्ष सिराज पानसरे, बिपीन सोष्टे, सुभाष पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.**



**माणगाव : भारतीय वृत्तपत्र दिनानिमित्त येथील वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांना उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते विजय मेथा, महेंद्र मेथा यांनी शुभेच्छा दिल्या.**

# श्रीवर्धनमध्ये छत्रपती शिवरायांचा अश्वारुढ पुतळा

## खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजन

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन नगर परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा जुने तहसील कार्यालयाच्या परिसरात अश्वारूढ पुतळा बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी खासदार सुनील तटकरे व महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले.

या वेळी प्रांताधिकारी महेश पाटील, तहसीलदार महेंद्र वाकलेकर, नगर परिषद मुख्याधिकारी विराज लबडे, मूर्तीकार महेंद्र थोपटे हे उपस्थित होते.



या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी, श्रीवर्धन हे पर्यटन क्षेत्र आहे. येथील समुद्रकिनाऱ्यांचे सुशोभीकरण झाल्यावर पर्यटन वाढले आहे. आता येणारा पर्यटक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक झाल्याशिवाय पुढे जाणार नाही. जिल्हा नियोजनेमार्फत मला, आदितीला व अनिकेतला मिळालेल्या निधीतून एक कोटी रुपये व खासदार निधीतून ५० लाख रुपये पुतळ्यासाठी उपलब्ध करून दिलेत. अजून निधीची आवश्यकता भासल्यास तोही उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन दिले.

मंत्री आदिती तटकरे यांनी, सर्वांच्या इच्छेनुसार व आपल्या सर्वांचे अनेक वर्षांचे स्वप्न साकार होणार आहे. जिल्हा नियोजन व महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांतर्गत हिंदुस्थानचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा व शिवस्मारक या कामांचे भूमिपूजन दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर होत आहे. विजयादशमी असूनसुद्धा श्रीवर्धनवासीय उपस्थित राहिले, याचा विशेष आनंद होतोय, असे सांगितले.

या वेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दर्शन विचारे, महिला तालुकाध्यक्ष सबा फिरफिरे, शहराध्यक्ष जितेंद्र सातनाक, शहर महिलाध्यक्ष राजसी मुरकर, शिवसेना शहरप्रमुख देवेंद्र भुसाणे तसेच माजी नगरसेवक, नगरसेविका, कर्मचारी उपस्थित होते.

### पुतळ्यासह शिवस्मारकही साकारणार

*ब्राँझ धातूपासून अश्वारुढ पुतळा साकारला जातोय. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट कला संचन यांच्या माध्यमातून साकारल्या जाणाऱ्या पुतळ्याचे मूर्तीकार महेंद्र थोपटे यांचा सत्कार खासदार सुनील तटकरे व मंत्री आदिती तटकरे यांनी केला. भगवान महावीर मार्गावरील जुने तहसील कार्यालय परिसरात एकोणीस गुंठ्यांत पुतळा व शिवस्मारक होत आहे. एकूण अंदाजित खर्च साडेतीन कोटी रुपये करण्यात येणार आहे.*

## पाली-खोपोली राज्य महामार्गावर विचित्र अपघात

### कारचे तोंड आकाशाकडे; तरुण बचावले

**पाली : प्रतिनिधी**

पाली-खोपोली राज्य महामार्गावर कारचा विचित्र अपघात झाला. पालीहून कार्ला येथे आई एकविरेच्या दर्शनासाठी जात असताना शेमडी गावाजवळ ताबा सुटल्याने कार रस्त्याच्या बाजूला जाऊन झाडावर आदळली. झाडाला आदळून ही कार रस्त्याच्या बाजूला आकाशाकडे तोंड करून उभी होती. कारमधील पाच तरुण थोडक्यात बचावले.



येथे वळणावर कार नियंत्रणाबाहेर जाऊन थेट रस्त्याच्या बाजूच्या झाडावर आदळून उलटली ज्यामुळे गाडीच्या पुढील भागाचे दृश्य खिळवून ठेवणारे होते. कारची पुढील बाजू व चाके आकाशाकडे उंचावलेली होती. कारमध्ये प्रवास करणारे पाच तरुण अक्षरशः मृत्यूच्या दारातून परतले. कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही, मात्र गाडीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

या अपघातानंतर प्रवासी आणि स्थानिकांनी अपघातग्रस्तांना मदत केली. सायंकाळी उशिरापर्यंत कार बाहेर काढण्याचे काम सुरू होते.

## परतीच्या पावसाने भातशेतीचे नुकसान; शेतकरी हवालदिल

**कर्जत : प्रतिनिधी**

यंदा पाऊस चांगला पडल्याने भातपिक चांगले आले होते. दिवाळीच्या आसपास आठवणी हंगामाला सुरुवात होते, मात्र गेले चार दिवस पडत असलेल्या पावसाने शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास काढून घेतला आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.



यंदा भातपिकाला पुरक पाऊस पडला. तालुक्यातील काही भागात भातपिक तयार झाले आहे. पाऊस थांबला की, साठवणी करायची असे शेतकऱ्यांनी ठरवले होते, मात्र परतीच्या पावसाने तयार भातपिकाचे नुकसान होत आहे.

काही शेतकऱ्यांनी लवकर येणारे पीक कापून शेतात वाळवण्यासाठी पसरवून ठेवले आहे, मात्र गेले चार दिवस तालुक्यातील कोणत्या ना कोणत्या भागात परतीचा पाऊस पडत आहे. त्यामुळे हे पीक कुजण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. हा पाऊस असाच पडत राहिला तर भात पिकाचा एकही दाणा मिळणार नाही.

**शासनाने हवामान खात्याच्या अंदाजानुसार परतीच्या पावसाची घोषणा करणे गरजेचे होते. भातपिक शेतात कापून ठेवल्याने ते कुजण्याची व भाताच्या दाण्यांना मोड येऊन भातपिकाचे नुकसान होत आहे.**

**-शशिकांत मोहिते, प्रगतशील शेतकरी**

## 'स्वदेस'तर्फे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**सुधागड** : स्वदेस फाउंडेशनतर्फे बारावीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना आणली आहे. त्यामुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार होणार आहे.

मागील अनेक शैक्षणिक वर्षांत स्वदेस फाउंडेशनच्या मदतीने ५५४ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे. स्वदेस फाउंडेशनमार्फत जे गरीब आणि होतकरू विद्यार्थी आहेत त्यांनी या शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी म्हसळा, सुधागड, श्रीवर्धन राकेश पवार (८६६८६३७७१३), महाड, पोलादपूर विनोद पाटील (९२७२००६७४३), माणगाव व तळा दीप्ती खैरे (९१४५९२३४०१) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## माणगावात कै. काकासाहेब चितळे स्मृती केंद्राचे नूतनीकरण



**माणगाव : प्रतिनिधी**

कै. काकासाहेब चितळे स्मृती केंद्राच्या वास्तूचे नूतनीकरण शनिवारी (दि.१२) करण्यात आले.

या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक दत्तोपंत साळुंखे, कोकण प्रांत कार्यकारिणी सदस्य अतुल कारखानीस, कै. काकासाहेब चितळे स्मृती केंद्र महाड-गोरेगाव अध्यक्ष धनंजय परांजपे, राष्ट्रीय स्वयंसेवक जिल्हा संघचालक शिवराज भागवत आदींच्या हस्ते नूतनीकरणाचे उद्‍घाटन करण्यात आले. हे कार्यालय बहुउद्देशीय होऊन समाजाला दिशादर्शक व्हावे, समाजातील सर्वांना या कार्यालयाचा उपयोग होईल, असा विश्वास ज्येष्ठ स्वयंसेवक दत्तोपंत साळुंखे यांनी व्यक्त केला.

अतुल कारखानीस यांनी कार्यालयाची उपयुक्तता, संघकाम व समाज तसेच आधुनिक काळात कार्यालयांचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते वैचारिक विमर्श पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमास संघ विभाग कार्यवाह विजय सावंत, सहकार्यवाह सुनील पाटील, जिल्हा कार्यवाह प्रशांत ढेपे, तालुका कार्यवाह प्रकाश टेंबे, पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघचालक शिवराज भागवत यांनी केले. सूत्रसंचालन अजित शेडगे यांनी केले, तर आभार काशिनाथ गाणेकर यांनी मानले.

## माथेरान डोंगरालगतच्या घरांना सुरक्षेची गरज; जमिनीवरील भार वाढतोय

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या डोंगरालगत राहणाऱ्या लोकांच्या घरांना सुरक्षाकवचाची गरज निर्माण झाली आहे.

काही ठिकाणी मुरुमाच्या मातीच्या जुन्या ढिगाऱ्यावरसुद्धा घरे बांधलेली आहेत. त्यामुळे अतिवृष्टीत येथील कड्यालगत असलेल्या घरांना नगर परिषदेमार्फत पावसाळ्यात अन्य सुरक्षितस्थळी आपला मुक्काम करावा लागतो. अतिवृष्टीमुळे एखाद्या भागाला धोकादेखील निर्माण होऊ शकतो. त्यासाठी संरक्षण भिंती उभारणे गरजेचे बनले आहे.



माथेरानमध्ये वाढती लोकसंख्या लक्षात घेता, साधारण पाच दशकांपूर्वी येथे मिळेल त्याठिकाणी पिढ्यान्‌पिढ्या वास्तव्यास असणाऱ्या भूमिपुत्रांनी आपल्या घरे उभारून कुटुंबासह राहू लागले होते, परंतु मागील १५ वर्षांपासून याठिकाणी घरांचा पसारा इतका वाढला आहे की, गल्लीबोळसुद्धा व्यापलेली आहेत. मागील काळात आमदार निधीतून काही भागात संरक्षण भिंती उभारल्या गेल्या आहेत. त्याच धर्तीवर येथील धोकादायक घरांच्या संरक्षणासाठी सुरक्षाकवच म्हणून आरसीसी बांधकाम करून भिंत उभारल्यास लोकांना संरक्षण मिळू शकते.

# कोकणात कोजागरी पौर्णिमेची आतुरता

**पाली : प्रतिनिधी**

कोजागरी पौर्णिमा ज्याला शरद पौर्णिमा असेही म्हणतात, हा भारतीय उपखंडातील एक महत्त्वाचा सण आहे. आश्विन महिन्यात मध्यरात्रीला असणाऱ्या पौर्णिमेला कोजागरी पौर्णिमा म्हणतात. या दिवशी चंद्र पूर्णपणे प्रकाशमान असतो. या सणाला कृषी संस्कृतीत, नैसर्गिक, खगोलीय व धार्मिकदृष्ट्या महत्त्वदेखील आहे.



या दिवशी चंद्र हा पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो. ही एक खगोलीय घटना आहे. पूर्ण चंद्राच्या प्रकाशात पाण्यात चंद्राचे प्रतिबिंब पाहण्यासाठी लोक बाहेर पडतात. रायगड जिल्ह्यात, या सणाला विशेष महत्त्व आहे. या दिवशी ठिकठिकाणी जागरण करून लोक विविध उपक्रम राबवितात. शिवाय एकत्र येऊन वेगवेगळे पदार्थ करून खातात. सध्या सर्वांना कोजागरीचे वेध लागले आहेत. या वेळी दूध, तांदूळ, साखर व इतर पदार्थांचे नैवेद्य अर्पण केले जातात.

या दिवशी, देवी लक्ष्मीच्या कृपेसाठी प्रार्थना केली जाते. या सणाचे सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व देखील आहे, कारण लोक एकत्र येऊन हा सण आनंदाने व उत्साहाने साजरा करतात.

या दिवशी देवी लक्ष्मीची, इंद्राची व बळीराजाची ही पुजा केली जाते. लोक चंद्राचे दर्शन घेऊन त्याची प्रार्थना करतात, कारण यामुळे संपत्ती आणि समृद्धी मिळेल असे मानले जाते. लोक शुद्ध आणि आरोग्यदायी आहार घेतात, ज्यात दूध, तांदूळ, व गोड पदार्थांचा समावेश असतो.

### दूध व पाण्याचे महत्त्व

*कोजागरीच्या रात्री पाण्यात चंद्राचे प्रतिबिंब पाहणे अत्यंत शुभ मानले जाते. त्यामुळे लोक नदी, तलाव किंवा समुद्रकिनाऱ्यावर जाऊन चंद्राचे दर्शन घेतात. बऱ्याच ठिकाणी रात्री १२वा.च्या दरम्यान दूध तापवले जाते. त्यात केशर, पिस्ते, बदाम, चारोळी, वेलदोडे, जायफळ, साखर वगैरे गोष्टी घालून, लक्ष्मीदेवीला नैवेद्य दाखविला जातो. दुधात मध्यरात्री पूर्ण चंद्राची किरणे पडू देतात आणि मग ते आटवलेले दूध सर्वजण फस्त करतात.*

### सामाजिक सलोखा

*कोजागरी पौर्णिमेला लोक आवर्जून एकत्र येतात, एकमेकांना गोडधोड वस्तू देतात. शिवाय सोसायटी, आळी, नगर आदी ठिकाणची मंडळी मिळून वेगवेगळे जिन्नस बनवतात. सर्वजण एकत्रितपणे हा सण साजरा करतात. त्यामुळे समाजामध्ये एकजुटीचा अनुभव मिळतो व सामाजिक सलोखा राहतो.*

### निसर्गाबद्दल कृतज्ञता :

*कृषी संस्कृतीमध्ये या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. निसर्गाबद्दल वाटणाऱ्या कृतज्ञतेपोटी कोकणात नवान्न पौर्णिमा म्हणजेच कोजागरी पौर्णिमा साजरी करण्याची प्रथा आहे. या दिवशी बाजारात भाताच्या लोंब्या, कुरडूची फुले, नाचणी, वरी आणि झेंडूची फुले खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी होते. घरासमोर लावलेल्या भाज्या नवान्न पौर्णिमेला महत्त्वाच्या ठरतात. नवीन धान्य, भाज्या यांची रेलचेल असते. हे सर्व म्हणजे शेतकऱ्यांची लक्ष्मी असते. यासाठी नवान्न पौर्णिमेला लक्ष्मीच्या स्वागतासाठी घरासमोर रांगोळ्या काढतात. मुख्य प्रवेशद्वारावर व घरातील महत्त्वाच्या वस्तूंवर नव्याचे तोरण बांधतात.*

## अलिबागमध्ये कोजागरी मैफिल

**अलिबाग** : मैफिल संस्थेतर्फे कोजागरी पौर्णिमेनिमित्त बुधवारी (दि.१६) सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध युवा गायक शमिका भिडे आणि धनंजय म्हसकर यांचा स्वरगंध कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी उदय जोशी (९९२१९२४५००) किंवा भालचंद्र देशपांडे (८८८८५०००२५) यांच्याशी संपर्क साधावा.

**ओमकार आर्केड सहकारी गृहनिर्माण संस्था**

**जाहिर नोटीस**

जा.क्र. ३४/२०२४-२५ दिनांक :- १४/१०/२०२४

नवीन पनवेल येथील नामांकित गृहनिर्माण संस्थेस टेरेस वर सोलर सिस्टीम बसवायची आहे, तरी सोलर एनर्जी मध्ये काम करणाऱ्या नामांकित कंपन्यांनी खालील मोबाईल क्र. व इमेल आयडी वर संपर्क साधावा.

मोबाईल नं. ८४२२९५३७९९

सही/-
ओमकार आर्केड सहकारी गृहनिर्माण संस्था
सचिव
भूखंड क्रमांक २४, सेक्टर १५ अे, नवीन पनवेल,
जि. रायगड, पिन- ४१०२०६.

# आजपासून भारत-न्यूझीलंड पहिली कसोटी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्ध दणदणीत विजय मिळवलेल्या भारतीय क्रिकेट संघाची बुधवार (दि. १६)पासून तुल्यबळ न्यूझीलंड संघाविरुद्ध कसोटी मालिका सुरू होणार आहे. या मालिकेत तीन सामने असून त्यातील पहिला सामना बंगळुरूच्या चिन्नस्वामी स्टेडियमवर सुरू होणार आहे.

या मालिकेसाठी भारत आणि न्यूझीलंड संघांनी कसून तयारी केली आहे. दोन्ही संघांकडे तोलामोलाचे खेळाडू आहेत. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील टीम इंडिया या मालिकेतील फेव्हरेट मानली जात आहे, पण नव्या कर्णधारासह भारत दौऱ्यावर आलेला किवी संघ काही कमी नाही. जो टॉम लॅथमच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाला चकित करू शकतो. अशा परिस्थितीत या कसोटी मालिकेत दोन्ही संघांमध्ये रंजक लढत अपेक्षित आहे.



कसोटी क्रिकेटमध्ये भारत आणि न्यूझीलंडचा इतिहास मोठा आहे. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत एकूण ६२ कसोटी सामने खेळले गेले आहेत. या कसोटी सामन्यांमध्ये भारतीय क्रिकेट संघाने २२ सामने जिंकले, तर न्यूझीलंडने १३ सामने जिंकले आहेत. याशिवाय २७ सामने अनिर्णित राहिले. अशा स्थितीत टीम इंडियाने किवी संघावर वर्चस्व राखल्याचे स्पष्ट होते. आता या मालिकेत भारतीय संघ आपला दबदबा कायम राखण्यात यशस्वी होतो की, न्यूझीलंड इतिहास बदलतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

मालिकेतील दुसरा सामना २४ ते २८ ऑक्टोबरदरम्यान पुण्यात, तर तिसरा सामना १ नोव्हेंबर ते ५ नोव्हेंबरदरम्यान मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२३-२५च्या अंतिम सामन्यासाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या मालिकेत चाहत्यांना जबरदस्त स्पर्धा पहायला मिळेल.

### पावसाचे सावट

गेल्या दोन दिवसांपासून बंगळुरूमध्ये पाऊस पडत आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला कसोटी सामना १६ ऑक्टोबरपासून खेळवला जाणार असून पाऊस पडला तर त्याचा थेट परिणाम सामन्यावर होणार आहे. चिन्नास्वामी मैदानाची ड्रेनेज व्यवस्था चांगली असली तरी सतत पाऊस पडल्यास परिस्थिती आणखी बिघडू शकते.

## पृथ्वीराज जवके रायगडच्या कर्णधारपदी

**पाली : प्रतिनिधी**

माणगावच्या फायटर्स क्रिकेट अकॅडमी संघाचा खेळाडू पृथ्वीराज उदय जवके याची रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन अंडर १४ संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. याबद्दल त्याचे कौतुक होत आहे.



फायटर क्रिकेट अकॅडमीचे प्रशिक्षक रोहित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पृथ्वीराज जवके याने क्रिकेट खेळात आपली पकड मजबूत केली आहे. नियमित सराव, अविरत परिश्रम व प्रशिक्षकांच्या अचूक मार्गदर्शनाखाली पृथ्वीराजने आपल्या नेतृत्व गुणांना वाव दिला आहे, तर शेखर भगत, सुनील पवार यांनीही क्रिकेटशी संबंधित सूचना व फिटनेससंदर्भात आवश्यक ते मार्गदर्शन केले.

पृथ्वीराजला कुहिरे येथील जय भवानी क्रीडा मंडळाच्या सदस्यांनी नेहमीच प्रोत्साहित केले. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले.



दरम्यान, महाराष्ट्र अंडर १४ आमंत्रित स्पर्धेसाठी १५ ऑक्टोबरला रायगड जिल्ह्याचा संघ सोलापूर येथे रवाना होणार आहे. या संघात पृथ्वीराज जवके याची कर्णधारपदी निवड झाल्याबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.


विशेष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धा

## इन्शोअर कोट, भारत पेट्रोलियम, शिवशक्ती, डॉ. शिरोडकर संघ अंतिम फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

इन्शोअर कोट, भारत पेट्रोलियम यांनी शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित केलेल्या विशेष व्यावसायिक गटाच्या कबड्डी स्पर्धेतील अंतिम फेरीत धडक दिली. महिला गटात अंतिम फेरी गाठण्याचा मान पुन्हा एकदा शिवशक्ती व डॉ. शिरोडकर यांनी मिळविला.





दादर (पूर्व) शिंदेवाडी येथील भवानीमाता क्रीडांगणावर झालेल्या विशेष व्यावसायिक गटाच्या उपांत्य फेरीत इन्शोअर कोटने रिझर्व्ह बँकेचा प्रतिकार ३२-२३ असा मोडून काढला. अभिषेकच्या झंझावाती चढाया त्याला राकेश, विजय यांची मिळालेली पकडीची साथ यांच्या जोरावर इन्शोअर कोटने पूर्वार्धात १८-०६ अशी आश्वासक आघाडी घेतली. उत्तरार्धात सूर सापडलेल्या बँकेच्या तुषार शिंदे, तेजस टक्के यांनी चतुरस्त्र खेळ करीत ही आघाडी सहा गुणावर आणली, परंतु शेवटच्या पाच मिनिटात पुन्हा एकदा बँकेचा संयम सुटला आणि त्यांना नऊ गुणांनी पराभव स्वीकारावा लागला.

दुसऱ्या सामन्यात भारत पेट्रोलियमने न्यू इंडिया एन्शोरन्सला ३४-१७ असे पराभूत केले. आकाश पिकलमुंडे याच्या आक्रमक चढाया त्याला मिळालेली निलेश शिंदेंची पकडीची साथ यामुळे हा मोठा विजय शक्य झाला. पेट्रोलियम अजूनही निलेशवरच अवलंबून आहे असे या विजयावरून वाटते. न्यू इंडियाकडून ऋषिक शेलार बरा खेळला.

महिलांच्या उपांत्य सामन्यात शिवशक्ती संघाने जिजामाता महिलांचा ४१-२१ असा पाडाव केला. पूर्ण डावात तीन लोण व पाच बोनस गुण घेत शिवशक्तीने सामना एकतर्फी केला. पूजा यादव, प्राची भादवणकर यांच्या सर्वांगसुंदर खेळाला या विजयाचे श्रेय जाते. तन्वी कदमने दुसऱ्या डावात थोडाफार प्रतिकार केला.

दुसऱ्या सामन्यात डॉ. शिरोडकरने श्री स्वामी समर्थचा ६१-२३ असा सहज पराभव केला. मेघा कदम, नेहा कदम यांच्या झंझावाती खेळाने पहिल्या डावात ३२-११ अशी आघाडी घेणाऱ्या शिरोडकरने उत्तरार्धातही खेळाचा तोच जोश कायम राखत गुणांचे अर्धशतक पार केले. स्वामी समर्थची साक्षी गिलबिले एकाकी लढली.

## पाकला नमवत न्यूझीलंड सेमी फायनलमध्ये

### भारतीय महिला संघाचे टी-२० वर्ल्डकपमधील आव्हान संपुष्टात

**शारजा : वृत्तसंस्था**

युएईमध्ये सुरू असलेल्या महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत न्यूझीलंडने पाकिस्तानवर ५४ धावांनी विजय मिळवला. या विजयासह न्यूझीलंडने सेमी फायनलमध्ये धडक मारली आहे, तर पराभवासह पाकिस्तानचे आणि पर्यायाने भारतीय संघाचे आव्हानही प्राथमिक फेरीतच संपुष्टात आले आहे.

वर्ल्डकपच्या सलामीच्या लढतीत भारतीय संघाचा न्यूझीलंडविरुद्ध मोठ्या फरकाने पराभव झाला होता. या दारुण पराभवामुळे भारतीय संघाच्या नेट रनरेटवरही परिणाम झाला होता. भारतीय संघाने पाकिस्तान आणि श्रीलंकेला नमवत पुनरागमन केले, मात्र रविवारी झालेल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव केला. या पराभवामुळे भारतीय संघाचे भवितव्य पाकिस्तानच्या हाती गेले.

न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना ११० धावांची मजल मारली. प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानकडून खराब फलंदाजी पहावयास मिळाली आणि पाकिस्तानचा डाव ५६ धावांतच आटोपला.

न्यूझीलंडकडून अमेलिआ केरने तीन, एडन कार्सनने दोन, तर रोसमरी मेअर, लिआ ताहूहू आणि फ्रान जोनास यांनी प्रत्येकी एक विकेट मिळवली.

## कुस्ती स्पर्धेत 'सीकेटी'च्या धनाजी तांडेलचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


विभागीय कुस्ती फ्री स्टाईल स्पर्धेत चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी सिद्धेश धनाजी तांडेल (बारावी कला शाखा) याने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय अंतर्गत पनवेल महापालिका विभागीय कुस्ती फ्री स्टाईल स्पर्धा रोडपाली येथील पोलीस मुख्यालय या ठिकाणी झाली. या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोते, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी सिद्धेशचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## देशपांडे चेस अकॅडमीचे नवव्या वर्षात पदार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

देशपांडे चेस अकॅडमीने १५ ऑक्टोबर रोजी कामकाजाच्या नवव्या वर्षात प्रवेश करताना एक महत्त्वपूर्ण टप्पा ओलांडला. किशोर देशपांडे यांनी स्थापन केलेली ही अॅकॅडमी बुद्धिबळ प्रतिभेला जोपासण्यात भूमिका बजावत आहे.



अकॅडमीचा वर्धापन दिन साजरा होत असताना किशोर देशपांडे यांच्या निधनाला ४८ दिवस पूर्ण होत असल्याने हा प्रसंग कटू आहे. त्यांची दृष्टी आणि बुद्धिबळाची आवड ही अकॅडमीच्या स्थापनेमागील प्रेरक शक्ती होती आणि त्यांचा वारसा संबंधित सर्वांना प्रेरणा देत आहे. इच्छुक खेळाडूंना शिकण्यासाठी, स्पर्धा करण्यासाठी आणि क्रीडासंस्कृती वाढण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी देशपांडे यांचे बुद्धिबळातील समर्पण नेहमीच स्मरणात राहील. त्यांच्या मार्गदर्शनाखाली देशपांडे चेस अकॅडमी अनेक प्रतिभावान बुद्धिबळपटू घडवणारी एक नामांकित संस्था बनली आहे.

अकॅडमी नवव्या वर्षात पदार्पण करत असताना देशपांडे यांचा वारसा पुढे नेण्यासाठी ती कटिबद्ध आहे. किशोर देशपांडे यांच्या सन्मानार्थ अकॅडमी एक विशेष स्पर्धा ठेवणार आहे. येत्या काही दिवसांनी या स्पर्धेची माहिती जाहीर केली जाणार आहे.

## मोहम्मद शमीच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावरही प्रश्नचिन्ह -रोहित

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघ बुधवारपासून मायदेशात न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका खेळणार आहे. या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना बंगळुरू येथे होणार आहे. दरम्यान, सामन्याच्या एक दिवस आधी भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने पत्रकार परिषदेत अनेक प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. भारत-न्यूझीलंड या मालिकेबद्दल बोलताना रोहित शर्माने मोहम्मद शमीबाबत मोठा खुलासा केला आहे.

रोहित शर्माने भारताचा महत्त्वाचा वेगवान गोलंदाज असलेल्या मोहम्मद शमीबद्दल मोठा खुलासा केला आहे. मोहम्मद शमी अजूनही दुखापतीतून सावरलेला नाही. तो आता सुरू होणाऱ्या न्यूझीलंड मालिकेचा भाग तर नाही, पण पुढील मालिकेत खेळू शकेल की नाही यावरही प्रश्नचिन्ह आहे.

मोहम्मद शमीबद्दल बोलताना रोहित शर्माने सांगितले, खरे सांगायचे तर ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर शमीबाबत निर्णय घेणे खूप अवघड आहे. त्याला आणखी एक धक्का बसला असून त्याच्या गुडघ्याला पुन्हा सूज आली आहे. आता त्याला पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करावी लागेल. शमी एनसीएमध्ये डॉक्टर आणि फिजिओच्या देखरेखीखाली आहे. दुखापत असलेल्या शमीला ऑस्ट्रेलियाला घेऊन जाऊ शकत नाही. तो लवकर दुखापतीतून सावरेल अशी आशा आहे. शमीच्या दुखापतीबद्दल अलिकडे आलेला रिपोर्ट काही प्रमाणात खरा असल्याचे रोहित शर्माच्या या विधानावरून खरा होता, अशीही चर्चा आहे.



### 'डब्ल्यूटीसी'च्या दृष्टीने मालिका महत्त्वपूर्ण

ऑस्ट्रेलियाविरुद्धची कसोटी मालिका पाच सामन्यांची असणार आहे. ही बॉर्डर-गावसकर ट्रॉफी कसोटी मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) अंतर्गत होणार आहे. पुढील वर्षी होणाऱ्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये कोणते संघ अंतिम फेरीत खेळतील हे या मालिकेतून निश्चित होण्याची शक्यता आहे. सध्या भारत आणि ऑस्ट्रेलिया यासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे, पण एखाद्या सामन्याच्या निकालानेही पूर्ण गुणतालिकेत बदल घडून येऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक सामना अत्यंत महत्त्वाचा असणार आहे.

शमीला पुन्हा दुखापत झाल्याची बातमी सोशल मीडियावर पसरली तेव्हा गोलंदाजाने लिहिले होते की, अशा निराधार अफवा का पसरवल्या जात आहेत आणि मी बरा होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. शमी म्हणाला की, बीसीसीआय आणि मी बॉर्डर-गावसकर मालिकेतून बाहेर असल्याचे म्हटलेले नाही. शमीने चाहत्यांना अशा बातम्यांकडे लक्ष देऊ नये, असेही आवाहन केले होते.

## स्टार फुटबॉलर एम्बापेवर बलात्काराचा आरोप

**पॅरिस** : फुटबॉल जगतातील नवा हिरो आणि युवा स्टार स्ट्रायकर किलियन एम्बापे गंभीर आरोपामुळे अडचणीत आला आहे. फ्रान्स आणि रिअल मॅड्रिडच्या ताफ्यातून खेळणाऱ्या या स्टार फुटबॉलरने एका महिलेच्या अब्रूला हात घातल्याचा दावा एका रिपोर्ट्सच्या माध्यमातून करण्यात आला आहे. या वृत्तामुळे एकच खळबळ माजली आहे.

दुसरीकडे फुटबॉलर एम्बापे याने मात्र ही 'फेक न्यूज' असल्याचे सांगत गंभीर आरोप असणारा दावा फेटाळून लावला आहे. संबंधित वृत्तपत्रावर कायदेशीर कारवाई करण्याची तयारीही त्याने सुरू केलीये.

## बॅडमिंटनपटू रिधिमा म्हात्रेची राज्यस्तरावर निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, उपसंचालक विभाग मुंबई, जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा अधिकारी ठाणे कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १४ वर्षाखालील वयोगटामध्ये बॅटमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालयातील रिधिमा म्हात्रे हिने विभागीय बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम क्रमांक पाठविला आहे.



रिधिमा हिची परभणी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत निवड झाली आहे. या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका प्रणिता गोळे ,पर्यवेक्षक अरुण जोशी, क्रीडा शिक्षिका वर्षा नलावडे, वामन कुऱ्हाडे यांच्यासह शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी रिधिमाचे अभिनंदन केले आणि तिला पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

## शतकवीर संजू सॅमसनचे केरळमध्ये जंगी स्वागत

**तिरुअनंतपुरम : वृत्तसंस्था**

भारत आणि बांगलादेश यांच्यात १२ ऑक्टोबर रोजी हैदराबाद येथे तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटचा सामना खेळला गेला होता. या सामन्यात संजूने सॅमसने वादळी अर्धशतक झळकावत भारताला १३३ धावांनी विजय मिळवला होता. आता टी-२० मालिका संपल्यानंतर संजू सॅमसन केरळला परतला असून येथे खासदार शशी थरुर यांनी त्याचे जंगी स्वागत केले.



हैदराबादमध्ये शानदार शतक झळकावल्यानंतर संजू सॅमसन तिरुअनंतपुरमला पोहचला, तेव्हा त्याचे एखाद्या हिरोसारखे स्वागत करण्यात आले. इतकेच नाही तर तिरुवनंतपुरमचे खासदार शशी थरूर यांनी २९ वर्षीय संजू सॅमसन याचे त्यांच्या घरी स्वागत केले आणि दक्षिण भारतीय पारंपरिक 'पोनाडा', शाल देऊन त्याचा सन्मान केला.

आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सचा कर्णधार असलेला संजू सॅमसनची टी-२० विश्वचषक २०२४साठी भारतीय संघात निवड करण्यात आली होता, परंतु त्याला या स्पर्धेत एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. यानंतर त्याला झिम्बाब्वे दौऱ्यात संधी देण्यात आली होती. त्यानंतर श्रीलंका दौऱ्यातून वगळण्यात आले.

राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टी-२० सामन्यात संजू सॅमसनने स्फोटक खेळी केली. उजव्या हाताच्या फलंदाजाने अवघ्या ४७ चेंडूत १११ धावा करून पहिले टी-२० शतक झळकावले. त्याने ४७ चेंडूत आठ षटकार आणि ११ चौकारांच्या मदतीने १११ धावा केल्या. अवघ्या ४० चेंडूत शतक झळकावत त्याने भारताला २९७ धावांचा डोंगर उभा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. या कालावधीत त्याचा स्ट्राइक रेट २३६.७१ होता. त्याचे हे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील भारतासाठी दुसरे वेगवान शतक ठरले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com